१८.	**आंतरराष्ट्रीय योग दिवस**	२०२२-२३	दिनांक २१ जून, २०२३ ला आंतरराष्ट्रीय योगा दिवसाला प्रत्येक महाविद्यालयामध्ये योग शिबिराचे आयोजन करण्यात येत असते त्यामध्ये २७,६०० विद्यार्थी रासेयो स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.
१९.	**आपत्ती व्यवस्थापन**	२०२२-२३	आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम या ५ जिल्हयामध्ये २ दीवासीय कार्यशाळेचे आयोजन केले आणि S.D.R.F आणि N.D.R.F या प्रशिक्षकाकडून १०,८५० रासेयो स्वयंसेवकांना प्रशिक्षित करण्यात आले. यांपैकी १५० रासेयो स्वयंसेवक आणि १० कार्यक्रमाधिकारी यांना महामहीम राज्यपाल निर्मित आव्हान या १० दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेमध्ये जळगाव येथे सहभागी झाले होते आणि त्यांनी उत्कृष्ट प्रदर्शन करून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ राष्ट्रीय स्वंयसेवक योजना याला महाराष्ट्रातून सर्वात्तम विद्यापीठ पुरस्कार २ प्राप्त केला आहे.
२०.	**महाराष्ट्र शासनद्वारा संचालित राज्य स्तरीय साहसी शिबिर**	२०२२-२३	सहासी शिबीर २ नोव्हेंबर, २०२२ ते ६ नोव्हेंबर, २०२२ पर्यंत चिखलदारा येथे राज्यस्तरीय सहासी शिबिरांचे आयोजन करण्यात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठा द्वारे करण्यात आले आणि या शिबिरामध्ये १७ विद्यापीठाचा सहभाग झाला होता. या शिबिरांच्या समारोपाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभलेले मा. ना. श्री. चंद्रकांतदादा पाटील, उच्च व शिक्षण

१	२	३	४
			मंत्री महाराष्ट्र शासन यांनी राज्यस्तरीय सहासी शिबिरातील शिबिरांर्थ्यांना मार्गदर्शन केले व अभिनंदन केले. मा. राज्य संपर्क अधिकारी डॉ. प्रशांत कुमार वनांजे, मा. कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे, मा. प्र.कुलगुरू डॉ. विजय चौबे उपस्थित होते.
२१.	**लम्पी आजार**	२०२२-२३	पशू जनावरे यांना लंपी आजाराने ग्रासले होते आणि त्यामुळे २०० महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकातील पथकाने लंम्पी आजरावरील कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर घेण्यात आला, व या माध्यमातून हजारो जनावरांचे प्राण वाचले.
२२.	**राष्ट्रीय युवा संसद भारत सरकार**	२०२२-२३	राष्ट्रीय युवा संसद भारत सरकार द्वारा आयोजित कार्यक्रमामध्ये १८० रासेयो स्वयंसेवकांनी सहभाग घेतला कु. श्रेया शेळके, सिपना इंजिनिअरिंग महाविद्यालय अमरावती. यांची दोनदा राष्ट्रीय स्तरावर निवड झाली आणि उत्कृष्ट संसदपटू म्हणून लोकसभा सभापती ओम बिर्ला तसेच मा. श्री. अनुराग ठाकूर युवा व खेळ मंत्रालय भारत सरकार यांच्याकडून पुरस्कार देण्यात आला तसेच कु. तनुश्री मुरतकर, जगदंबा महाविद्यालय, यवतमाळ यांनी राष्ट्रीय युवा संसद कार्यक्रमामध्ये सहभाग घेतला.

*****

३) विद्यार्थी विकास विभाग

०१. वादविवाद स्पर्धा :

दिनांक ०४ ऑक्टोबर, २०२२ रोजी मुंबई विद्यापीठ, मुंबई विद्यापीठातर्फे माजी कुलपती डॉ.पी.सी.अलेक्झांडर इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेमध्ये श्री शिवाजी कला-वाणिज्य महाविद्यालय, अमरावती येथील विद्यार्थी श्री.वेदांग चौधरी हा विद्यार्थी तर चमू व्यवस्थापक म्हणून प्रा.मंगेश रामेश्वर अडगोकर, गो.सी.टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदुर बाजार यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेमध्ये श्री.वेदांग चौधरी या विद्यार्थ्यांने द्वितीय क्रमांक प्राप्त करून विद्यापीठाचे शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

तसेच दिनांक ०७ ऑक्टोबर, २०२२ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे आंतर विद्यापीठ मराठी वक्तृत्व स्पर्धेमध्ये जिजामाता कला महाविद्यालय, दारव्हा, जि.यवतमाळ येथील विद्यार्थीनी कु.साक्षी देशकरी ही विद्यार्थीनी तर चमू व्यवस्थापक डॉ.सोनल कामे, श्रीमती आर.डी.जी.महिला महाविद्यालय, अकोला यांनी सहभाग घेतला.

दि. २२ व २३ जानेवारी, २०२३ या कालावधीत शिक्षा मंडळ वर्धा तर्फे ४७ वा कमलनयन बजाज स्मृती राष्ट्रीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन शिक्षा मंडळ, वर्धा येथे करण्यात आले होते. सदर स्पर्धेत श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला येथील विद्यार्थिनी कु.खुशी एस खत्री हिने सहभाग घेतला.

०२. विद्यार्थी सुरक्षा विमा योजना :

सन २०२२-२०२३ या सत्राकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित ३९८ महाविद्यालये व ३४ पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील एकूण २,१४,१७३ विद्यार्थ्यांचा विद्यार्थी सुरक्षा विमा दि ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी, अमरावती यांचेकडून करारनामा करण्यात येऊन काढण्यात आला. याकरिता विमा कंपनीस एकूण रु. २१,४१,७३०/- एवढ्या रकमेचे शोधन करण्यात आले आहे.

03. Financial Aid to Students :

अ) विद्यार्थी कल्याण निधी शिष्यवृत्ती :

सत्र २०२२-२०२३ मध्ये विद्यार्थी विकास निधीमधून एकूण १७१ विद्यार्थ्यांना रुपये २,८०,०००/- एवढ्या शिष्यवृत्तीचे शोधन करण्यात आले.

शिष्यवृत्तीचा तपशील

अ.क्र.	विद्याशाखा	स्नातक				स्नातकोत्तर			
		प्राप्त आवेदनपत्रानुसार निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येचा तपशिल				प्राप्त आवेदनपत्रानुसार निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येचा तपशिल			
		एकूण प्राप्त अर्जाची संख्या	निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या	नुतनीकरण	एकूण (४+५)	एकूण प्राप्त अर्जाची संख्या	निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या	नुतनीकरण	एकूण (८+९)
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
०१.	वाङ्मय व समाजविज्ञान	८५	४९	०१	५०	०३	०२	००	०२
०२.	वाणिज्य	१६०	२४	०६	३०	१५	१५	००	१५
०३.	विज्ञान	९४	३३	००	३३	३८	२६	०५	३१
०४.	गृहविज्ञान	००	००	००	००	००	००	००	००
०५.	शिक्षण	००	००	००	००	००	००	००	००
०६.	विधी	००	००	००	००	००	००	००	००
०७.	वैद्यक	००	००	००	००	००	००	००	००
०८.	अभियांत्रिकी	५४	०७	००	०७	००	००	००	००
	एकूण	२९३	११३	०७	१२०	५६	४३	०५	४८

इतर शिष्यवृत्ती

अ.क्र.	उपक्रम	विनियमानुसार एकूण देय शिष्यवृत्तीचा तपशिल		प्राप्त आवेदनपत्रानुसार निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येचा तपशिल		
		देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीची संख्या	एकूण	एकूण प्राप्त अर्जाची संख्या	निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या	एकूण
१	२	३	४	४	६	७
०१.	एन.एन.एस.	०८	०८	००	००	००
०२.	क्रिडा	०८	०८	००	००	००
०३.	सांस्कृतिक कार्यक्रम	०८	०८	००	००	००
०४.	एन.सी.सी.	०६	०६	०७	०४	०३
	एकूण	३०	३०	०७	०४	०३

ब) स्व.प्रा.रामप्रकाश शामलाल राठी स्मृती शिष्यवृत्ती :

प्रा.रामप्रकाश शामलाल राठी स्मृती शिष्यवृत्तीकरिता एकूण ०५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप करावी लागते. पात्र असलेल्या खालील एकूण ०५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून सदर विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु.१५००/- प्रमाणे एकूण रु.७,५००/- एवढी शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली.

अ.क्र.	विद्यार्थ्यांचे नांव	महाविद्यालयाचे नांव	रक्कम
०१.	कु. प्राची रामकृष्ण कुचर	शंकरलाल खंडेलवाल कला-वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला	१५००/-
०२.	कु. वैष्णवी शिवदास बंगाळे	स्व.भास्करराव शिंगणे कला, प्रो.नारायणराव गावंडे विज्ञान व आशालता गावंडे वाणिज्य महाविद्यालय, साखरखेर्डा, जि.बुलढाणा (३३६)	१५००/-
०३.	कु. श्रुती गजानन भिसे	शंकरलाल खंडेलवाल कला-वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला (२२९)	१५००/-
०४.	कु. संजना दिलीप इंदोलिया	शंकरलाल खंडेलवाल कला-वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला (२२९)	१५००/-
०५.	कु. पूजा शालिक डहाके	जिजामाता कला महाविद्यालय, दारव्हा, जि. यवतमाळ (४५४)	१५००/-

क) संत गाडगे बाबा 'विद्याधन योजना' :

संत गाडगे बाबा विद्याधन योजनेअंतर्गत एकूण २८ पात्र विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक व्याजाचे एकूण रुपये १,८०,०६८/- (अक्षरी रु. एक लक्ष ऐंशी हजार अडुसष्ट फक्त) एवढ्या राशीचे शोधन करण्यात आलेले आहे.

ड) संत गाडगे बाबा 'कमवा व शिका योजना' :

सत्र २०२२-२०२३ मध्ये संत गाडगे बाबा 'कमवा व शिका' योजनेअंतर्गत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील एकूण २२ महाविद्यालयातील ६८ विद्यार्थी तर विद्यापीठाचे एकूण १२ शैक्षिणक विभागातील एकूण ४६ विद्यार्थी असे एकूण ११४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. यामध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील एकूण २१ महाविद्यालयातील ३४ विद्यार्थी तर विद्यापीठाचे एकूण १० शैक्षणिक विभागातील २६ विद्यार्थी असे एकूण ६० विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतलेला आहे. तसेच या योजनेंतर्गत आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील एकूण ०८ विद्यार्थी तर केंद्रीय प्रवेश समिती अंतर्गत कार्य केलेल्या एकूण ०९ विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतलेला आहे.

इ) संत गाडगे बाबा 'विद्यार्थिनी बस पास सवलत योजना' :

सत्र २०२२-२०२३ करीता संत गाडगे बाबा विद्यार्थीनी बस पास सवलत योजनेंतर्गत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित २५ महाविद्यालयातील ८५ विद्यार्थिनी तर विद्यापीठाचे १० शैक्षणिक विभागातील एकूण २४ विद्यार्थिनी असे एकूण १०९ विद्यार्थिनींची निवड करण्यात आली होती. यामध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील एकूण ०७ महाविद्यालयातील २० विद्यार्थीनी तर विद्यापीठाचे एकूण ०९ शैक्षणिक विभागातील २१ विद्यार्थिनी असे एकूण ४१ विद्यार्थिनींनी या योजनेचा लाभ घेतलेला आहे.

फ) संत गाडगे बाबा 'शुद्ध पेयजल योजना' :

सत्र २०२२-२०२३ मध्ये संत गाडगे बाबा शुद्ध पेयजल योजनेअंतर्गत खालील एकूण ०५ महाविद्यालयांची निवड करण्यात आली होती.

अ.क्र.	महाविद्यालयाचे नांव
०१.	गुंजकर कॉलेज, आवार, ता.खामगांव, जि. बुलढाणा
०२.	श्री पद्मप्रभ दिगंबर जैन कला महाविद्यालय, अनसिंग, जि.वाशिम
०३.	कला-वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मारेगाव, जि.यवतमाळ
०४.	स्व.कमलताई बनमेरु कला-वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, लोणार, जि. बुलढाणा
०५.	श्री संत तुकाराम महाराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चोहट्टा बाजार, ता. अकोट, जि.अकोला

ग) संत गाडगे बाबा 'विद्यार्थी शिक्षण संरक्षण योजना' :

सत्र २०२२-२०२३ मध्ये संत गाडगे बाबा शिक्षण संरक्षण योजनेअंतर्गत खालील एकूण ०८ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. परंतु ०३ विद्यार्थी इतर शिष्यवृत्तीचा लाभ घेत असल्यामुळे नियमानुसार अपात्र ठरलेले आहे. त्यामुळे सत्र २०२२-२०२३ मध्ये संत गाडगे बाबा शिक्षण संरक्षण योजनेअंतर्गत खालीलप्रमाणे ०५ विद्यार्थ्यांनी लाभ घेतलेला आहे.

अ.क्र.	विद्यार्थ्याचे नांव	महाविद्यालयाचे नांव
०२.	कु.निकिता गजानन खांडकुरे	बॅ. आर. डि. आय. के. महाविद्यालय, बडनेरा
०३.	कु.धनश्री रूपराव कावरे	बॅ. आर. डि. आय. के. महाविद्यालय, बडनेरा
०४.	कु.प्रणिता रमेश नागोसे	बॅ. आर. डि. आय. के. महाविद्यालय, बडनेरा
०५.	कु.मनीषा सुनिल कांबळे	बॅ. आर. डि. आय. के. महाविद्यालय, बडनेरा

ह) **कौशल्य विकास योजना :**

सत्र २०२२-२०२३ मध्ये विनियम क्रं.१२/२०१९ नुसार संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरीता कौशल्य विकास योजना सुरू करण्यात आलेली असून सदर योजना ही संलग्नित महाविद्यालयामध्ये मा.कुलगुरू महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार प्रथम सत्राकरिता **दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२२ ते दिनांक ३० नोव्हेंबर, २०२२** या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आल्यात. यामध्ये **अमरावती जिल्हा-०९ अकोला जिल्हा-०४, बुलडाणा जिल्हा-१०, यवतमाळ जिल्हा-०८ व वाशिम जिल्हा-०२ असे एकूण ३३** महाविद्यालयांनी या योजनेमध्ये सहभागी होऊन **एकूण १४४२** विद्यार्थ्यांना लाभ घेतलेला आहे.

तसेच द्वितीय सत्राकरिता **दिनांक १६ फेब्रुवारी, २०२३ ते दिनांक १५ मार्च, २०२३** या कालावधीत सुद्धा आयोजित करण्यात आली. यामध्ये **अमरावती जिल्हा-०७ अकोला जिल्हा-०६, बुलडाणा जिल्हा-०४, यवतमाळ जिल्हा-०४ व वाशिम जिल्हा-०४ असे एकूण २५** महाविद्यालये या योजनेमध्ये सहभागी होऊन एकूण १०९८ विद्यार्थ्यांनी लाभ घेतलेला आहे.

***

विद्यापीठ विद्यार्थी परिषदेचे कार्यक्रम :

विद्यापीठ विद्यार्थी परिषद व विद्यापीठ शैक्षणिक विभाग विद्यार्थी परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेले उपक्रम :

सत्र २०२२-२०२३ करिता शासनाकडून विद्यापीठ विद्यार्थी परिषद गठन करण्यासंदर्भात कोणत्याही प्रकारचे आदेश प्राप्त न झाल्यामुळे सत्र २०२२-२०२३ मध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ विद्यार्थी परिषदेचे गठन करण्यात आले नाही. त्यामुळे विद्यापीठ विद्यार्थी परिषदेद्वारे कोणत्याही प्रकारचे कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले नाहीत.

४) विद्यापीठ विद्यार्थी परिषद निवड :

सत्र २०२२-२०२३ करिता शासनाकडून कोणत्याही प्रकारचे आदेश प्राप्त न झाल्यामुळे सत्र २०२१-२२ मध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ विद्यार्थी परिषदेचे गठन करण्यात आले नाही.

५) **इतर माहिती :**

अ) **संसदीय प्रशिक्षण अभ्यासक्रम :**

राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखा, महाराष्ट्र विधान भवन सचिवालय, विधान भवन, मुंबई तर्फे नागपूर येथे **मंगळवार, दिनांक २० डिसेंबर ते मंगळवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२२** या कालावधीत ४९ व्या सांसदीय कार्यप्रणाली व प्रथा हा अभ्यासवर्ग आयोजित केला होता.

आयोजित ४९ व्या सांसदीय कार्यप्रणाली व प्रथा या अभ्यास वर्गाकरिता खालील विद्यार्थी व अधिव्याख्याते सहभागी झाले होते.

अ. क्र.	विद्यार्थ्याचे नाव	वर्ग	महाविद्यालयाचे नाव	संपर्क क्रमांक	ई-मेल
०१	दिनेश मनोहर वानेरे	एम.ए. भाग-२	पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ	९८६०५२६६८५	dineshwanere@gmail.com
०२	हरिओम मुकुंदराव वांगे	एम.ए. भाग-२	पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ	९७६६८२४९८९	hariomwange@gmail.com
०३	ऋत्विक सुधीर हागोणे	एम.ए. भाग-२	शासकीय विदर्भ ज्ञान-विज्ञान संस्था, अमरावती	९३७०८५६२०९	rutvikhogane@gmail.com
०४	कु.जान्हवी उमेश रघुवंशी	एम.ए. भाग-२	श्री शिवाजी कला-वाणिज्य महाविद्यालय अमरावती	७६२०६२८५१७ ९८२३९३३२०५	Janvhiraghuwnshi28@gmail.com
०५	कु.कांचन विजय डोंगरे	एम.ए. भाग-२	सीताबाई कला-वाणिज्य व विज्ञान महा. अकोला	७८८७७२५२८३	Kanchandongre17@gmail.com
०६	दत्तात्रय पंढरी गाढवे	एम.ए. भाग-२	श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्याल, चिखली	७८७५०२८४०१	Dattagadhve1826@gmail.com
०७	प्रा.डॉ.नागेश खुशालराव गायकवाड	अधिव्याख्याता राज्यशास्त्र विभाग	एस. पी. एम.चे तात्यासाहेब महाजन कला-वाणिज्य महाविद्यालय, चिखली, जि.बुलढाणा	९६८९३३११९२ ९४०४७२१६७३	nageshgaikwad69@gmail.com

ब) **Students Induction Programme-2022 :**

संत गाडगे बाबाा अमरावती विद्यापीठाद्वारे सत्र २०२२-२०२३ मध्ये प्रथमतःच दिनांक २१ ते ३० जुलै, २०२२ या कालावधीत मा.कुलगुरू महोदयांच्या अध्यक्षतेखाली व प्र-कुलगुरू यांचे प्रमुख उपस्थितीत विद्यापीठाच्या सभागृहामध्ये आभासी पद्धतीने (Online) झूम ॲप (Zoom App) व You Tube द्वारे थेट प्रक्षेपण (Live) विविध लिंकवरून Students Induction Programme चे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाकरिता मा.श्रीमती पवनीत कौर, जिल्हाधिकारी, अमरावती, मा. श्री. विकासचंद्र रस्तोगी, सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई, मा.डॉ. डी. डी. पांढरपट्टे, विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती, मा. श्री. संजय जाधव, उद्योजक तथा संचालक, जाधव ग्रुप, अमरावती, मा. प्रोफेसर एम. पी. पुनिया, उपाध्यक्ष, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली व मा. प्रोफेसर रजनिश जैन, सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली या मान्यवरांचे बहुमोलाचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाकरिता विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या पाचही जिल्हातील महाविद्यालयाचे विश्वस्त, प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थ्यांनी तसेच विद्यापीठ पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

क) आंतर महाविद्यालयीन स्पर्धा आयोजन :

विद्यापीठ आणि आंतर विद्यापीठ तसेच अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्तरावर सांस्कृतिक स्पर्धांमध्ये संलग्नित महाविद्यालयांच्या आणि विद्यापीठ शैक्षणिक विभागांच्या विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा, त्यांच्यातील सुप्त गुणांचा विकास व्हावा यादृष्टीने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व विद्यार्थी विकास मंडळ प्रयत्नशिल असून सातत्याने प्रगती पथाकडे वाटचाल करीत आहे.

ड) आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव आयोजन :

विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय भावना वाढीस लागावी तसेच त्यांच्यातील कलागुणांना व कलात्मक मूल्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी दरवर्षी आवर्जून विद्यापीठ युवा महोत्सवाचे आयोजन केले जाते. या हेतूने २०२२-२०२३ या सत्रात युवा महोत्सवाचे आयोजन **श्री शिवाजी कला-वाणिज्य महाविद्यालय, अमरावती येथे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ ते १५ ऑक्टोबर, २०२२** या कालावधित यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले.

या युवा महोत्सवाचा उद्घाटन समारंभ संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरु मा.डॉ.दिलीप मालखेडे यांचे अध्यक्षतेखाली, तर उद्घाटक म्हणून मा. श्री. हर्षवर्धन देशमुख, अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती हे होते. तसेच या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून मा. सौ. सुलभाताई खोडके, आमदार, अमरावती, मा. श्री. दिलीपबाबू इंगोले, कोषाध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती व मा. डॉ. केशव तुपे, सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती तसेच विशेष आकर्षण मा. मोनालिसा बागल, सिने अभिनेत्री व मा. निखील वैरागर, प्रसिद्ध अभिनेता हे होते. संयोजक म्हणून प्रा. डॉ. रामेश्वर भिसे, प्राचार्य, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती, सांस्कृतिक चमू निवड समिती सदस्य डॉ. प्रफुल्ल गवई, एस. पी. एम. महाविद्यालय, चिखली, डॉ. सौ.जयश्री वैष्णव, महिला महाविद्यालय, अमरावती, प्रा.कमलताई भोंडे, अमरावती, डॉ. रेखा मग्गीरवार, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती व डॉ.राजीव बोरकर, संचालक, विद्यार्थी विकास संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे विशेष उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता.

या युवा महोत्सवाचा समारोप समारंभ दिनांक १५ ऑक्टोप्रार, २०२२ रोजी मा. डॉ. दिलीप मालखेडे, कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे अध्यक्षतेखाली, मा. ॲड. गजाननराव पुंडकर, उपाध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती, मा. डॉ. विजयकुमार चौबे, प्र-कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, मा. ॲड. जयवंतराव उपाख्य भैयासाहेब पाटील पुसदेकर, उपाध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती, मा. श्री. केशवराव मेतकर, उपाध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती, मा. श्री. हेमंतभाऊ काळमेघ, सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती, मा.प्राचार्य श्री.

केशवराव गावंडे, सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती, मा.श्री.सुरेशदादा खोटरे, सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती, मा. प्रा. श्री. सुभाषराव बनसोड, सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती, मा. प्राचार्य वि. गो. ठाकरे, सचिव, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती, यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये तर डॉ. तुषार देशमुख, कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, प्रा. डॉ. रामेश्वर भिसे, श्री शिवाजी कला-वाणिज्य महाविद्यालय, अमरावती, सांस्कृतिक चमू निवड समिती सदस्य डॉ. प्रफुल्ल गवई, एस. पी. एम. महाविद्यालय, चिखली, डॉ. सौ.जयश्री वैष्णव, महिला महाविद्यालय, अमरावती, प्रा. कमलताई भोंडे, अमरावती, डॉ. रेखा मग्गीरवार, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती व डॉ. राजीव बोरकर, संचालक, विद्यार्थी विकास संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे विशेष उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता.

हा युवा महोत्सव अखिल भारतीय विद्यापीठ संघ, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक संहितेप्रमाणे घेण्यात आला. या महोत्सवात **दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ ते १५ ऑक्टोबर, २०२२** पर्यंत एकांकिका, स्किट, माईम, लोकनृत्य, सुगम संगीत, शास्त्रीय गायन, समूहगान, पाश्च्यात गायन, शास्त्रीय नृत्य, स्वर वाद्य, तालवाद्य, स्पॉट पेंटींग, पोस्टर मेकींग, कोलाज, कार्टूनिंग, क्ले मॉडेलिंग, रांगोळी, वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा आणि क्विझ, फोक ऑर्केस्ट्रॉ इत्यादी नावीण्यपूर्ण स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर पाचही जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थिनी सहभागी झाले होते. संपूर्ण अमरावती शहर व संपूर्ण अमरावती विभागातील परिसर या महोत्सव कालावधित विद्यार्थ्यांच्या कलागुण सादरीकरणाने भारावून गेला होता.

या युवा महोत्सवामध्ये प्रत्येक स्पर्धा प्रकारात प्रथम, द्वितीय व तृतीय बक्षीसे देण्यात आली. सदर पुरस्कार हे आयोजित करण्यात आलेल्या एकूण विविध २७ कला प्रकारांमध्ये प्रदान करण्यात आले. या महोत्सवामध्ये सहभागी झालेल्या महाविद्यालयांपैकी ज्या महाविद्यालयांनी सर्वाधिक गुण संपादन केलेत अशा महाविद्यालयांना सर्वसाधारण विजेता म्हणून पुरस्कारसुद्धा प्रदान करण्यात आलेले आहेत. या वर्षी सर्वसाधारण विजेता पुरस्काराकरिता श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती यांच्याकडे सदर फिरते चषक प्रदान करण्यात आले.

हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी विद्यापीठाचे सांस्कृतिक समितीचे सन्माननीय सदस्य यांनी अथक परिश्रम घेतले. त्याचप्रमाणे श्री शिवाजी कला-वाणिज्य महाविद्यालय, अमरावती येथील प्राचार्य, सर्व शिक्षण विभागांचे विभाग प्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचारीवृंद यांचे या महोत्सवाच्या संचलनात फ्राहुमोल सहकार्य लाभले.

****

४) आंतर विद्यापीठ युवामहोत्सव मध्ये सहभागी विद्यापीठ चमूंची कामिगरी :

अ) महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ युवा महोत्सव इंद्रधनुष्य-२०२२ चमू:

सत्र २०२२-२०२३ मध्ये **महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे दिनांक ०५ ते ०९ नोव्हेंबर, २०२२** या कालावधित संपन्न झालेल्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ युवा महोत्सव इंद्रधनुष्य - २०२२ मध्ये सहभागी झाली होती.

या स्पर्धेमध्ये विद्यापीठाच्या युवा महोत्सव चमूने व चमूतील कलावंतांनी खालीलप्रमाणे विविध कलाप्रकारामध्ये सुयश संपादन केले आहे.

कलाप्रकार, स्पर्धक, कलावंत व साथीदार यांची यादी

अ.क्र.	स्पर्धक/कलावंत/ साथीदारांचे नाव	महाविद्यालयांचे नाव	प्रावीण्य स्थान
०१.	**पाश्चिमात्य वाद्य संगीत**		**प्रथम**
i)	श्री.ऋषिकेश दुधाळे	श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती	

उपरोक्त कलाप्रकार वगळता उर्वरित कलाप्रकारांचा सहभागसुद्धा अप्रतिम ठरला असून या चमूला चमू व्यवस्थापक म्हणून डॉ.सारिका श्रावणे, स्व.छगनलाल मुलजीभाई कढी महाविद्यालय, अचलपूर कॅम्प यांचे सुद्धा मौलिक मार्गदर्शन लाभले.

ब) पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ युवा महोत्सव चमू :

सत्र २०२२-२०२३ मध्ये **संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ युवा महोत्सव चमू गणपत विद्यापीठ, मेहसाना (गुजरात) येथे दिनांक १० ते १४ फेब्रुवारी, २०२३** या कालावधीत संपन्न होत असलेल्या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ युवा महोत्सवामध्ये सहभागी झाली होती.

या स्पर्धेमध्ये विद्यापीठाच्या युवा महोत्सव चमूने व चमूतील कलांवंतांनी खालीलप्रमाणे विविध कलाप्रकारांमध्ये सुयश संपादन केले आहे.

कलाप्रकार, स्पर्धक, कलावंत व साथीदार यांची यादी

अ.क्र.	स्पर्धक/कलावंत/ साथीदारांचे नाव	महाविद्यालयांचे नाव	प्रावीण्य स्थान
०१.	**शास्त्रीय वाद्य संगीत तालवाद्य**		**प्रथम**
i)	श्री.पवन सिडाम	सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला.	
	साथीदार		
i)	श्री.ऋषिकेश दुधाळे	श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती	
०२.	**पाश्चिमात्य समुहगान**		**व्दितीय**
i)	कु.स्वरश्री केतकर	पद्व्युत्तर शैक्षणिक विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ	
ii)	कु.निकिता मोने	महिला महाविद्यालय, अमरावती.	
iii)	कु.दिव्या बसोले	शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.	
iv)	श्री.राहुल पवार	महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती.	

अ.क्र.	स्पर्धक/कलावंत/ साथीदारांचे नाव	महाविद्यालयांचे नाव	प्रावीण्य स्थान
v)	श्री. क्रिश आत्राम	शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.	
vi)	श्री. वेदांत उमरे	श्री.शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती	
	साथीदार		
i)	श्री. सर्वेश पाठक	शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.	
ii)	श्री. अभिजित भावे	अमरावती	
iii)	श्री. प्रशांत ठाकरे	अमरावती	
०३.	**वक्तृत्व स्पर्धा**		**व्दितीय**
i)	कु. खुशी एस.खत्री	श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला.	
०४.	**फाईन आर्ट (पोस्टर मेकिंग)**		**व्दितीय**
i)	कु. रुद्राणी बारब्दे	श्री. शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती	
०५.	**वेस्टर्न सोलो**		**तृतीय**
i)	कु. दिव्या बसोले	शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.	
०६.	**वादविवाद**		**तृतीय**
i)	कु. सकिना अली	कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, अकोला.	
ii)	कु. गौरी ककरानीया	श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती	
०७.	**पाश्चिमात्य वाद्य संगीत**		**चतुर्थ**
i)	श्री. ऋषिकेश दुधाळे	श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती	
०८.	**फाईन आर्ट (क्ले मॉडेलिंग)**		**चतुर्थ**
i)	श्री.यश इंगोले	दि कॉलेज ऑफ ॲनिमेशन बायोईजि. ॲन्ड रिसर्च सेंटर, अम.	
०९.	**फाईन आर्ट (कोलाज)**		**पाचवे**
i)	कु.रुद्राणी बारब्दे	श्री.शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती	
१०.	**सर्व साधारण विजेतेपद**	(Overall Championship Literary Events)	**व्दितीय**
११.	**सर्व साधारण विजेतेपद**	(Overall Championship All Events)	**पाचवे**

उपरोक्त कलाप्रकार वगळता उर्वरित कलाप्रकारांचा सहभागसुद्धा अप्रतिम ठरला असून या चमूला चमू व्यवस्थापक म्हणून डॉ.सोपान वतारे, श्री. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला व डॉ.सारिका श्रावणे, स्व.छगनलाल मुलजीभाई कढी महाविद्यालय, अचलपूर कॅम्प यांचेसुद्धा मौलिक मार्गदर्शन लाभले.

क) अखिल भारतीय आंतर विद्यापीठ युवा महोत्सव चमू :

सत्र २०२२-२०२३ मध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ युवा महोत्सव चमू बंगलोर (कर्नाटक) येथे दिनांक २४ ते २८ फेब्रुवारी, २०२३ या कालावधीत संपन्न झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ युवा महोत्सवामध्ये सहभागी झाली होती.

या स्पर्धेमध्ये विद्यापीठाच्या युवा महोत्सव चमूने व चमूतील कलांवंतांनी खालीलप्रमाणे विविध कलाप्रकारांमध्ये सुयश संपादन केले आहे.

कलाप्रकार, स्पर्धक, कलावंत व साथीदार यांची यादी

अ.क्र.	स्पर्धक/कलावंत/ साथीदारांचे नाव	महाविद्यालयांचे नाव	प्रावीण्य स्थान
०१.	**शास्त्रीय वाद्य संगीत तालवाद्य**		**द्वितीय**
i)	श्री. पवन सिडाम	सिताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला.	
	साथीदार		
i)	श्री. ऋषिकेश दुधाळे	श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती	
०२.	**फाईन आर्ट (पोस्टर मेकिंग)**		**द्वितीय**
i)	कु.रुद्राणी बारब्दे	पद्व्युत्तर शैक्षणिक विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ	
०३.	**वादविवाद**		**द्वितीय**
i)	कु.सकिना अली	कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, अकोला.	
ii)	कु.गौरी ककरानीया	श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती	
०४.	**पाश्चिमात्य समुहगान**		**तृतीय**
i)	कु.स्वरश्री केतकर	पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ	
ii)	कु.निकिता मोने	महिला महाविद्यालय, अमरावती.	
iii)	कु.दिव्या बसोले	शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.	
iv)	श्री.राहुल पवार	महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती.	
v)	श्री. क्रिश आत्राम	शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.	
vi)	श्री.वेदांत उमरे	श्री.शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती	

अ.क्र.	स्पर्धक/कलावंत/ साथीदारांचे नाव	महाविद्यालयांचे नाव	प्रावीण्य स्थान
	साथीदार		
i)	श्री.सर्वेश पाठक	शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.	
ii)	श्री.ऋषिकेश दुधाळे	श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती	
iii)	श्री.अभिजित भावे	अमरावती	

उपरोक्त कलाप्रकार वगळता उर्वरित कलाप्रकारांचा सहभागसुद्धा अप्रतिम ठरला असून या चमूला चमू व्यवस्थापक म्हणून डॉ.सोपान वतारे, श्री.शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला व डॉ.सारिका श्रावणे, स्व.छगनलाल मुलजीभाई कढी महाविद्यालय, अचलपूर कॅम्प यांचेसुद्धा मौलिक मार्गदर्शन लाभले.

५) अखिल भारतीय आंतर विद्यापीठ राष्ट्रीय कव्वाली चमू :

सत्र २०२२-२०२३ मध्ये **संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ राष्ट्रीय कव्वाली चमू शारदा विद्यापीठ, नोएडा येथे दिनांक १६ ते १७ फेब्रुवारी, २०२३** या कालावधीत संपन्न होत असलेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेमध्ये सहभागी झाली होती.

या स्पर्धेमध्ये विद्यापीठाच्या राष्ट्रीय कव्वाली चमूतील कलावंतांनी द्वितीय स्थान प्राप्त करून सुयश संपादन केले आहे.

स्पर्धक, कलावंत व साथीदार यांची यादी

अ.क्र.	स्पर्धक/कलावंत/ साथीदारांचे नाव	महाविद्यालयांचे नाव	प्रावीण्य स्थान
i.	श्री. आशिष कैथवास	शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.	
ii.	श्री. शिवम शर्मा	सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला.	
iii.	श्री. यश मनवर	जवाहरलाल दर्डा इन्स्टिट्यूट ऑफ ईंजि.ॲन्ड टेक्नॉ.यवतमाळ	
iv.	श्री. सुमित वाहिने	जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय, दर्यापूर.	
v.	श्री. अमर कतोरे	महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती.	
vi.	कु. शरयू शेजे	श्री. शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती	
vii.	कु. भूमिका राऊत	श्रीमती एल. आर. टी. वाणिज्य महाविद्यालय, अकोला.	
viii.	कु. सलोनी सुकटे	लोकनायक बापुजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ	

अ.क्र.	स्पर्धक/कलावंत/ साथीदारांचे नाव	महाविद्यालयांचे नाव	प्रावीण्य स्थान
ix.	कु.संध्या रोहणकर	लोकनायक बापुजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ	
x.	कु.साक्षी वानखडे	१२६-विद्याभारती महाविद्यालय, अमरावती.	
	साथीदार		
i.	श्री. हितेश व्यास	परतवाडा	
ii.	श्री. कार्तिक नंदवंशी	परतवाडा	

या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग अप्रतिम ठरला असून या चमूला चमू व्यवस्थापक म्हणून डॉ. निखिलेश नलोडे, श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय, यवतमाळ व डॉ. निलिमा दवणे, लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी जि. यवतमाळ यांचेसुद्धा मौलिक मार्गदर्शन लाभले.

६) अखिल भारतीय आंतर विद्यापीठ महिला विद्यार्थी संसद चमू :

सत्र २०२२-२०२३ मध्ये **संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ महिला विद्यार्थी संसद चमू डॉ. एच. एस. गौर विद्यापीठ सागर येथे दिनांक १४ ते १६ मार्च, २०२३** या कालावधीत संपन्न झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ **महिला विद्यार्थी संसद** स्पर्धेमध्ये सहभागी झाली होती.

या स्पर्धेमध्ये विद्यापीठाच्या **महिला विद्यार्थी संसद** चमूने तृतीय उपविजेते पद प्राप्त करून सुयश संपादन केले आहे.

स्पर्धकांची यादी

अ.क्र.	स्पर्धकांचे नांव	महाविद्यालयांचे नांव
I.	कु.आकांक्षा असनारे	डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावती
II.	कु.श्रेया शेळके	सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, अमरावती
III.	कु.नफिसा शब्बीर हुसेन	इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी ॲन्ड रिसर्च, बडनेरा रेल्वे

या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग अप्रतिम ठरला असून या चमूला चमू व्यवस्थापक म्हणून डॉ. संतोष गोरे, लोकनायक बापुजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ व डॉ. अंजू फुलझेले, अमोलकचंद महाविद्यालय, व्यवतमाळ यांचेसुद्धा मौलिक मार्गदर्शन लाभले.

७) विद्यापीठ उत्कृष्ट कलावंत (मुले व मुली) पुरस्कार २०२२-२०२३ :

सत्र २०२२-२०२३ या शैक्षणिक सत्रात विद्यापीठातर्फे निवडण्यात येणाऱ्या उत्कृष्ट कलावंताचा बहुमान मुलांमध्ये **श्री. हिमांशु प्रवीण जैन, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, (स्वतंत्र महाविद्यालय) अमरावती** यांनी प्राप्त केला. या विद्यार्थ्यांचे विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने अभिनंदन करतांना अत्यंत आनंद होत आहे. विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रावीण्यासोबत विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक क्षेत्रातील नैपुण्यसुध्दा त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी तितकेच महत्त्वाचे असते,

याचा अनुभव विद्यापीठाला सांस्कृतिक नैपुण्य मिळविणाऱ्या उत्कृष्ट कलावंत पुरस्कार निवड प्रक्रियेतून सातत्याने मिळत आला आहे, आणि या अंगिकृत कार्यात सतत अग्रेसर राहण्यासाठी विद्यापीठ आपली वाटचाल करीत आहे.

८) **संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ** BEST NCC CADET (MAN & WOMEN) **पुरस्कार २०२२-२०२३ :**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाद्वारे विनियम क्रमांक १५/२०२२ अन्वये BEST NCC CADET (MAN & WOMEN) या पुरस्काराकरिता एन.सी.सी. पथकातून विविध एन.सी.सी. प्रकारामधून प्रतिनिधित्व केले असेल व ज्यांनी नैपुण्य प्राप्त करून पदके प्राप्त केली असतील अशा विद्यार्थ्यांची सत्र २०२२-२०२३ या शैक्षणिक सत्रात विद्यापीठातर्फे निवडण्यात येणाऱ्या उत्कृष्ट कलावंताचा बहुमान मुलांमध्ये **श्री. प्रवीण समाधान चिमकर, जनता कला-वाणिज्य महाविद्यालय, मलकापूर, जि. बुलढाणा** यांनी तर मुलींमध्ये **कु. आकांक्षा अविनाश असनारे, डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावती** यांनी प्राप्त केला. या विद्यार्थ्यांचे विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने अभिनंदन करतांना अत्यंत आनंद होत आहे. विद्यापीठाच्या शैक्षणिक प्राविण्यासोबत विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक क्षेत्रातील नैपुण्यसुद्धा त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी तितकेच महत्त्वाचे असते.

९) **संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ आदर्श विद्यार्थी पुरस्कार (मुले व मुली) २०२२-२०२३:**

विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयातील व विद्यापीठ शैक्षणिक विभागातील विद्यार्थ्यांनी पदवी व पदव्यूत्तर परीक्षांमध्ये विविध शैक्षणिक गुणवत्तेसह केलेल्या कामगिरींना उजाळा देण्याकरिता व त्याबाबत त्यांचे जीवनामध्ये त्यांना उच्च दर्जा प्राप्त होण्याकरिता प्रोत्साहित करणे, तसेच स्पर्धेच्या माध्यमातून त्यांना पुरस्कार प्रदान करण्याकरिता व त्यांचे भावी जीवनातील जीवन आणि सर्वसाधारण कल्याण यांच्या अभिवृद्धीसाठी व्यवस्था करणे याकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाद्वारे विद्यापीठ विनियम क्रमांक ०३/२०२२ अन्वये सत्र २०२२-२०२३ या शैक्षणिक सत्रात विद्यापीठातर्फे निवडण्यात येणाऱ्या उत्कृष्ट कलावंताचा बहुमान मुलांमध्ये **श्री. रोहन पन्नालाल बुंदेले, श्री शिवाजी कला-वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला** यांनी तर मुलींमध्ये **कु.स्वरश्री गजानन केतकर, विद्याभारती महाविद्यालय, अमरावती** यांनी प्राप्त केला.

****

४) गौरवान्वित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये सुरू करण्यात आलेल्या उपक्रमांतर्गत, खाली नमूद केलेल्या शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्यांनी विद्यापीठास दिलेल्या उत्कृष्ट सेवेबद्दल तसेच योगदानाबद्दल दि. १ मे, रोजी उत्कृष्ट सेवा गौरव प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत असतात त्यानुसार दि. १ मे २०२३ ला उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

अ) विद्यापीठ स्तर -

(अ) शिक्षक	:	**डॉ. श्रीकांत साहेबराव पाटील** संचालक, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
(ब) प्रथम श्रेणी अधिकारी	:	**सर्वसाधारण** **श्री राहुल मारोतराव नरवाडे** सहा. कुलसचिव (नामांकन) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती. **महिला राखीव** **डॉ. सुलभा विलास पाटील** उपकुलसचिव (विकास) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
(क) द्वितीय श्रेणी अधिकारी	:	**सर्वसाधारण** **श्री. माधव अंबादास कवीश्वर** अधीक्षक, गोपनिय विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
(ड) तृतीय श्रेणी कर्मचारी	:	**सर्वसाधारण** **श्री. संजय अंबादास ढाकुलकर** कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), अभियांत्रिकी विभाग संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती. **महिला राखीव** **सौ. अनुराधा मदन खडसे** वरिष्ठ सहायक, आस्थापना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
(इ) चतुर्थ श्रेणी कर्मचारी	:	**श्री. विलास जयराम परचाके** शिपाई, सारणी विभाग संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

महिला राखीव
कु. नेहा श्रीकांत बोंडे
प्रयोगशाळा परिचर (रासायनिक तंत्रशास्त्र विभाग)
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

ब) संलग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था स्तर -

(अ) प्राचार्य / संचालक :

सर्वसाधारण
प्राचार्य डॉ. अरविंद वसंतराव देशमुख
कला व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हा
महिला राखीव
प्राचार्य डॉ. आराधना गजानन वैद्य
श्री. भारतीय महाविद्यालय, अमरावती

(ब) शिक्षक :

सर्वसाधारण
डॉ. गजानन अरुणराव वाघ
श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती
महिला राखीव
डॉ. प्रियाकुमारी जितेंद्र खिल्लारे (धाबे)
शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला

(क) शिक्षकेत्तर कर्मचारी :

सर्वसाधारण
श्री. नितीन रावसाहेब तसरे
वरिष्ठ लिपीक, गो.सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदुर बाजार, जि. अमरावती.
महिला राखीव
डॉ.वैशाली दिगंबरराव देशमुख
प्रयोगशाळा सहाय्यक,
श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती.

नावीन्यपूर्ण उपक्रम :

'ई-चावडी'
स्व. भाष्कररराव शिंगणे कला, प्रा. नारायणराव गावंडे विज्ञान, आशालता गावंडे वाणिज्य महाविद्यालय
साखरखेर्डा, जि. बुलडाणा

*****

५) वार्षिकांक स्पर्धा

आंतर महाविद्यालयीन वार्षिकांक स्पर्धा २०२२-२०२३ मध्ये सहभागी झालेल्या व्यावसायिक व बिगर व्यावसायिक महाविद्यालयांपैकी खालील महाविद्यालयांचे वार्षिकांक पारितोषिकास पात्र ठरले :

बिगर व्यावसायिक महाविद्यालये (शहरी विभाग)

प्रथम	**"CREATION"** श्री. शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती.
द्वितीय	**'भारती'** भारतीय महाविद्यालय, अमरावती.
तृतीय	**'अक्षरवेल'** विनायक विद्या मंदीर महाविद्यालय, अमरावती.

बिगर व्यावसायिक महाविद्यालये (ग्रामीण विभाग)

प्रथम	**'फुलोर'** गो.सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदूर बाजार
द्वितीय	**'कदंबिनी'** इंदिरा महाविद्यालय, कळंब.
तृतीय	**'कल्पना'** फुलिसंग नाईक महाविद्यालय, पुसद.

व्यावसायिक महाविद्यालये (शहरी व ग्रामीण विभाग)

प्रथम	**"Techno - Rhythm" 2022-23** डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च, अमरावती.

द्वितीय	**"ASPIRE" 2023** प्रो. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च, बडनेरा.
तृतीय	**"INNOVATOR" 2023** सिपना अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, अमरावती.

*****

६) राष्ट्रीय छात्रसेना

जिल्हा	छात्रसेना विद्यार्थी		छात्रसेना अधिकारी		वार्षिक शिबिरात सहभागी				गणतंत्र दिवस संचलन शिबिर नवी दिल्ली सहभाग			बी प्रमाणपत्र उत्तीर्ण		सी प्रमाणपत्र उत्तीर्ण		युथ एक्सचेंज प्रोग्राम अंतर्गत सहभाग		थल सैनिक शिबिर, नवी दिल्ली सहभागी	
	मुले	मुली	पुरुष	स्त्री	मुले	मुली	अधिारी		मुले	मुली	अधिकारी	मुले	मुली	मुले	मुली	मुले	मुली	मुले	मुली
							पुरुष	स्त्री											
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	१७	१८	१९	२०
अमरावती	८१०	९९५	१७	८	५०५	६०४	१३	६	६	४	१	१३१	८१	७१	६७	-	-	५	-
अकोला	२९६	२८४	६	२	२५७	१९५	५	२	-	-	-	७१	५७	८५	६०	१९	११	५	-
बुलढाणा	७८५	३११	१२	२	३८१	१४४	७	१	-	-	-	१००	३३	८८	२६	-	-	-	१
यवतमाळ	४३९	२७२	७	१	२६७	९२	६	-	-	-	-	६६	५२	६४	२२	-	-	-	-
वाशिम	४१	११	१	-	२६	६	१	-	-	-	-	१३	३	६	३	-	-	-	-

७) जनसंपर्क - विविध कार्यक्रम

व्याख्यानमाला :

विद्यापीठाला विविध दानदात्यांकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून जनसंपर्क विभागाद्वारे अहवाल काळात खालील व्याख्यानमालांचे आयोजन करण्यात आले :

१) **प्रज्ञाचक्षू श्री संत गुलाबराव महाराज व्याख्यानमाला**

प्रज्ञाचक्षू श्री संत गुलाबराव महाराज व्याख्यानमालेचे प्रथम पुष्प दि. २७ जुलै, २०२२ रोजी श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथे **'प्रज्ञाचक्षू श्री संत गुलाबराव महाराज'** या विषयावर संपन्न झाले. सदर व्याख्यानमालेत प्रमुख वक्ते डॉ.सौ. नयनाताई ओमप्रकाश कडू अमरावती यांनी अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.एल.कुलट, दानदात्याचे प्रतिनिधी डॉ. अरविंद देशमुख व्यासपीठावर उपस्थित होते.

द्वितीय पुष्प दि. २८ जुलै, २०२२ रोजी विद्याभारती महाविद्यालय, अमरावती येथे **' समन्वयमहर्षी संत गुलाबराव महाराज'** या विषयावर संपन्न झाले. सदर व्याख्यानमालेत प्रमुख वक्ते डॉ.सौ. नयनाताई ओमप्रकाश कडू, अमरावती यांनी अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. याप्रसंगी माजी मंत्री आमदार बच्चूभाऊ कडू, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सौ. प्रज्ञा एस.येनकर, सचिव डॉ. ए. डी चव्हाण, दानदात्याचे प्रतिनिधी डॉ. अरविंद देशमुख व्यासपीठावर उपस्थित होते. व्याख्यानमालेच्या दोनही पुष्पांना महाविद्यालयातील शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी व शहरातील गणमान्य नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

२) **प्रचारभीष्म शामरावदादा मोकदम स्मृती ग्रामगीता व्याख्यानमाला :-**

प्रचारभीष्म शामरावदादा मोकदम स्मृती ग्रामगीता व्याख्यानमालेचे प्रथम पुष्प **'राष्ट्रसंतांची सामाजिक व शैक्षणिक क्रांती'** या विषयावर दि. ०५ ऑगस्ट, २०२२ रोजी डॉ. आर.जी. राठोड कला व विज्ञान महाविद्यालय, मूर्तिजापूर जि. अकोला येथे संपन्न झाले. सदर व्याख्यानमालेत प्रमुख वक्ते म्हणून श्री गुरुदेव अध्यात्म गुरुकुल, गुरुकुंज मोझरी, ता. तिवसा, जि. अमरावतीचे संचालक श्री. रवी मानव संचालक यांनी अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे, प्रचारभीष्म शामरावदादा मोकदम जन्मशताब्दी केंद्रीय समिती, अमरावतीचे अध्यक्ष श्री मधुभाऊ घारड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.पी.चर्जन, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर व्यासपीठावर उपस्थित होते.

द्वितीय पुष्प दि. ०६ ऑगस्ट, २०२२ रोजी महात्मा फुले वाणिज्य, विज्ञान व विठ्ठलराव राऊत कला महाविद्यालय, भातकुली, जि. अमरावती येथे **'राष्ट्रसंतांची सामाजिक व शैक्षणिक क्रांती'** या विषयावर संपन्न झाले. प्रमुख वक्ते म्हणून श्री गुरुदेव अध्यात्म गुरुकुल, गुरुकुंज मोझरी, ता. तिवसा, जि. अमरावतीचे संचालक श्री. रवी मानव संचालक यांनी अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे, प्रचारभीष्म शामरावदादा मोकदम जन्मशताब्दी केंद्रीय समिती, अमरावतीचे अध्यक्ष श्री मधुभाऊ घारड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के.एम. जमधाडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर व्यासपीठावर उपस्थित होते. व्याख्यानमालेच्या दोनही पुष्पांना महाविद्यालयातील शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी व शहरातील गणमान्य नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

३) **प्रथम कुलगुरू डॉ.के.जी. देशमुख स्मृती व्याख्यानमाला :-**

प्रथम कुलगुरू डॉ.के.जी. देशमुख स्मृती व्याख्यानमाला दि. १० ऑक्टोबर, २०२२ रोजी श्रीमती लक्ष्मीबाई राधाकिसन तोष्णीवाल वाणिज्य महाविद्यालय, अकोला येथे आयोजित करण्यात आली होती. **'समग्र उच्चशिक्षणाची**

दिशा' या विषयावर सदर व्याख्यानमाला संपन्न झाली. प्रमुख वक्ते म्हणून डॉ. मुरलीधर चांदेकर, माजी मा. कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती यांनी अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे, दानदाते डॉ. कमलताई काशीराव देशमुख, प्राचार्य डॉ.एस.जी. चापके, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, शहरातील गणमान्य नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

****

८) श्री. संत गाडगेबाबा अध्यासन केंद्र

- दि. २० डिसेंबर, २०२२ रोजी संत गाडगे बाबा यांच्या ६६ व्या पुण्यतिथीनिमित्त विद्यापीठ गेटवर गाडगे बाबांच्या प्रतिमेस माल्यार्पण व श्री ऋषीकेश रेडे व दलित मित्र पुरस्कार महाराष्ट्र शासन पुरस्कारप्राप्त श्री. उत्तमरावजी भैसने यांचे प्रबोधन.
- दि. २१ डिसेंबर, २०२२
    १) संत गाडगे बाबा यांच्या ६६ व्या पुण्यतिथीनिमत्त समाधी मंदिराजवळ पुरस्कार वितरण, अन्नदान, वस्त्रदान व गाडगेबाबांच्या तैलचित्राची श्री. मनीषजी भूतडा, अकोला यांच्याकडून सस्नेह भेट.
    २) वेलकम सिनिअर सिटीझन ग्रुप अमरावती यांची गाडगे बाबा अध्यासन केंद्रास भेट
    ३) बार्टी सेविका. (सामाजिक न्यायविभाग)
    ४) गणित विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती.
    ५) श्रीराम विद्यालय वडाळी अमरावती विद्यार्थी विद्यार्थिनी
    ६) भारतीय जनसंचार संस्थान अमरावती विद्यापीठ विद्यार्थी भेट
- दि. २३ डिसेंबर, २०२२ संत गाडगे बाबा भवन समिती कापूसतळणी यांच्याद्वारा संत गाडगे बाबांच्या दुर्मीळ छायाचित्रांची प्रदर्शनी
- दि. १७ जानेवारी, २०२३ Jon. Keune Associate Professor Michigam State University U.S.A. यांची गाडगे बाबा अध्यासन केंद्रास भेट व मार्गदर्शन.
- दि. १९ जानेवारी, २०२३
    १) संत गाडगे बाबा यांच्या दुर्मीळ छायाचित्राची प्रदर्शनी आदर्श गाव देवगाव, ता. अचलपूर, जि. अमरावती, स्थळ ग्रामपंचायत देवगाव भेट व मार्गदर्शन. शालेय विद्यार्थी, ग्रामस्थ, ग्रामपंचायत सरपंच व सदस्य
    २) स. ११.०० ते २.०० पंचशिल पोलीस कॉन्व्हेंट, कांडली, परतवाडा, जि. अमरावती येथे संत गाडगे बाबांच्या दुर्मीळ छायाचित्राची प्रदर्शनी शालेय विद्यार्थी व शिक्षक गण भेट व मार्गदर्शन
    ३) दु. ३.०० ते ६.०० पंचशील आश्रम शाळा बहिरम येथे संत गाडगे बाबा अध्यासन केंद्र संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या वतीने गाडगे बाबांच्या दुर्मीळ छायाचित्र प्रदर्शनीचे आयोजन. शालेय विद्यार्थी व शिक्षक व शिक्षकेत्तर, वृद्ध उपस्थित होते. भेट व मार्गदर्शन.

- दि. २७ जानेवारी, २०२३ इंद्रशेष महाराज संस्थान वडाळी, अमरावती येथे अन्नदान, वस्त्रदान कार्यक्रमास भेट व मार्गदर्शन.
- दि. २२ फेब्रुवारी, २०२३ डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी अमरावती, पशुसंवर्धन अधिकारी गट-अ यांचे पायाभूत प्रशिक्षण १३ फेब्रुवारी २४ मार्च २०२३ संत गाडगे बाबा अध्यासन केंद्र संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथे भेट व मार्गदर्शन
- दि. २३ फेब्रुवारी, २०२३ संत गाडगे बाबा अध्यासन केंद्रामध्ये संत गाडगे बाबा यांची जयंती साजरी करण्यात आली. मा. कुलगुरू, मा. प्र-कुलगुरू, मा. कुलसचिव, शिक्षक, अधिकारी व कर्मचारीवृंद IIMC चे विभागीय संचालक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.
- दि. १६ मार्च, २०२३ रोजी गरजूंना वस्त्रवाटप संत गाडगे बाबा अध्यासन केंद्र सं. गा. बा. अ. वि. द्वारा गाडगे बाबांच्या दशसूत्रीतील एक संदेश गरजूंना मदतीचा हात म्हणून उद्यान विभाग व सफाई कामगार (कंत्राटी पद्धतीवरील १३१ महिला) (साडी ब्लाउजपीस) व ४० पुरुषांना फुलपँट व शर्ट संत गाडगे बाबा सामाजिक पुरस्कार वितरण कार्यक्रम
- दि. १७ मार्च, २०२३ रोजी उद्यान विभाग कंत्राटी कामगार व सफाई कामगार यांची संत गाडगे बाबा अध्यासन केंद्रातील दुर्मीळ फोटो प्रदर्शनीस भेट व मार्गदर्शन.

श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार २०२२

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने स्व. द.ना. उपाख्य बबनराव मेटकर यांचेकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार २०२२ कार्यक्रमाचे आयोजन दि. १६ मार्च, २०२३ रोजी दुपारी १.०० वाजता विद्यापीठ अधिसभागृह येथे करण्यात आले. व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. प्रमोद येवले, प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगांवकर, दानदात्यांचे प्रतिनिधी डॉ.व्ही.एम. मेटकर, सत्कारमूर्ती श्री बंकटलाल काशिराम राठी, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, श्री संत गाडगे बाबा अध्यासन प्रमुख डॉ.दिलीप काळे व जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते. याप्रसंगी मा. कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांनी सत्कारमूर्ती श्री बंकटलाल काशिराम राठी यांना श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार देऊन विद्यापीठाच्यावतीने सन्मानित केले. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरव प्रमाणपत्र व रोख रू. १०,०००/- असे पुरस्काराचे स्वरूप होते.

*****

९) आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे २०२२-२३ या वर्षात खालीलप्रमाणे कार्यक्रम / कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत.

अ.क्र.	आयोजित महाविद्यालयाचे नाव	कार्यक्रम / कार्यशाळेचा विषय
१	२	३
१.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ रोजी विविध आंतरराष्ट्रीय कंपन्याच्या व्यवस्थापनात शिवाजी महाराजांचे व्यवस्थापन (शिवरायांचे दुर्गकारण) या विषयावर अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष : डॉ. श्रीकांत पाटील, संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग प्रमुख वक्ते : श्री राहुल नलावडे, दुर्ग अभ्यासक, शिवचरित्र अभ्यासक प्रमुख अतिथी : डॉ. पी. आर. राजपूत माजी प्राचार्य, ईन्नानी महाविद्यालय, कारंजा लाड आयोजकः एम. ए. छत्रपती शिवाजी महाराज विचारधारा आणि व्यवस्थापन स्थळ : वनस्पतिशास्त्र विभागाचे सभागृह
२.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	दिनांक १० ऑक्टोबर २०२२ रोजी "मानसिक आरोग्याचे महत्त्व" या विषयावर अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अध्यक्षः डॉ. श्रीकांत पाटील संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग प्रमुख वक्ते : डॉ. अक्षय चांदूरकर, एम. बी. बी. एस., सायकॉलॉजीस्ट केअर क्लिनिक आयोजकः एम. ए. / पी. जी. डिप्लोमा इन काउन्सिलिंग अँड सायकोथेरेपी स्थळ : आजीवन अध्ययन व विस्तार विभाग सभागृह
३.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	दिनांक १५ ऑक्टोबर २०२२ रोजी पदवी वितरण समारंभ संपन्न झाला. अध्यक्ष : डॉ. विजयकुमार चौबे, मा. प्र- कुलगुरू, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ प्रमुख उद्घाटकः श्रीमती सुलभाताई खोडके, आमदार अमरावती प्रमुख उपस्थिती : डॉ. तुषार देशमुख, मा. कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आयोजकः डॉ. श्रीकांत पाटील, संचालक, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग आयोजन : आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग स्थळ : डॉ. के. जी. देशमुख सभागृह
४.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	दिनांक १९, नोव्हेंबर २०२२ रोजी "नॅचरोपॅथीमधील ॲक्युप्रेशर आणि रिफ्लेक्सोलॉजीचे महत्त्व" या विषयावर अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अध्यक्षः डॉ. श्रीकांत पाटील, संचालक, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग प्रमुख अतिथी : डॉ. प्रदीप टाकू, ABCPC जनरल सेक्रेटरी न्यू

१	२	३
		दिल्ली. आयोजन : पी. जी. डिप्लोमा इन योगिक सायन्स स्थळ : आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाचे सभागृह.
५.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	दिनांक २६ नोव्हेंबर, २०२२ रोजी संविधान दिनानिमित्त - "आम्ही भारतीय लोक" या विषयावर अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अध्यक्ष : डॉ. श्रीकांत पाटील, संचालक, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग प्रमुख वक्ते : श्री. नितीन पवित्रकार, अभ्यासक, साहित्यिक आयोजन : एम. ए. आजीवन अध्ययन आणि विस्तार स्थळ : आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाचे सभागृह
६.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	दिनांक ६ डिसेंबर २०२२ रोजी महापरिनिर्वाण दिन कार्यक्रम साजरा करण्यात आला. अध्यक्ष : डॉ. श्रीकांत पाटील, संचालक, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग मुख्य अतिथी : डॉ. वैभव मस्के, सहा. प्राध्यापक छत्रपती शिवाजी महाराज विचारधारा आणि व्यवस्थापन आयोजन : एम. ए. आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग स्थळ : आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग
७.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	दिनांक १० डिसेंबर २०२२ रोजी ध्येयनिश्चिती समुपदेशन व संमोहन तंत्र या विषयावर कार्यशाळा संपन्न झाली. अध्यक्ष : डॉ. विजयकुमार चौबे, प्र कुलगुरू संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ प्रमुख वक्ते : डॉ. नवनाथ गायकवाड संमोहनतज्ञ कार्यक्रमाचे आयोजक : डॉ. श्रीकांत पाटील, संचालक, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग आयोजन : एम. ए. समुपदेशन मानसोपचार पद्धती स्थळ : डॉ. के. जी देशमुख सभागृह
८.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	दिनांक १६, १७ व १८ डिसेंबर २०२२ रोजी आंतरराष्ट्रीय परिषद - नॅचरोपॅथी अँड योगा आयोजित करण्यात आली होती. अध्यक्ष : डॉ. मोना चिमोटे, अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ उद्घाटक : डॉ. ए. पी. सिंह, ABCPC जनरल सेक्रेटरी, कलकत्ता. प्रमुख अतिथी : डॉ. प्रवीणजी सूर्यवंशी, सदस्य अधिसभा, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ आयोजक : १) डॉ. श्रीकांत पाटील, संचालक, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग. २) डॉ. रणजीत बसवनाथे, अध्यक्ष, नॅचरोपॅथी आणि योगा डॉक्टर्स मल्टीपर्पज असोसिएशन, इंडिया. आयोजन : पी. जी. डिप्लोमा इन नॅचरोपॅथी ॲन्ड योगिक सायन्स

१	२	३
९.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	दिनाक २४ डिसेंबर, २०२२ रोजी "काउन्सिलिंग - २१व्या शतकातील कौशल्य" या विषयावर अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अध्यक्ष : डॉ. श्रीकांत पाटील, संचालक, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागप्रमुख वक्ते : डॉ. संजय बोराडे, मानसोपचारतज्ञ आयोजन : एम. ए. समुपदेशन आणि मानसोपचार पद्धती स्थळ : डॉ. के.जी. देशमुख सभागृह
१०.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	दिनाक ३१ डिसेंबर, २०२२ रोजी "स्ट्रेस मॅनेजमेंट टेकनिक्स" या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. अध्यक्ष : डॉ. श्रीकांत पाटील, संचालक, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग प्रमुख वक्ते : डॉ. शिवाजी कुचे, Motivational speaker & Trainer स्थळ : आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागआयोजन : एम. ए. समुपदेशन आणि मानसोपचार पद्धती
११.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	दिनांक ०२ जानेवारी, २०२३ रोजी 'लघुसंशोधन प्रबंध सादरीकरणासाठी संशोधन पद्धती' या विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन एम. ए. समुपदेशन आणि मानसोपचार पद्धती अभ्यासक्रमद्वारे करण्यात आले होते. डॉ. श्रीकांत पाटील (संचालक, DLLE) यांच्या अध्यक्षतेखाली अतिथी व्याख्यान कार्यक्रम पार पडले. वक्ते डॉ. गजानन रत्नपारखी (प्राध्यापक, म. फुले महाविद्यालय अमरावती.) यांनी "संशोधन आराखडा स्वरुप आणि आराखड्यातील तांत्रिक बाबी" यावर संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले होते.
१२.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रम दिनांक ०३ जाने, २०२३ रोजी प्रा. शुभांगी रवाळे (समन्वयक, DNYS) यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला होता. कार्यक्रमास वक्ते म्हणून प्रा. मंजुषा बारबुधे (समन्वयक, C & PT) मार्गदर्शन केले. सावित्रीबाई फुले यांच्या सामाजिक कार्यावर आणि योगदानावर प्रकाश टाकण्यात आला होता.
१३.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	पत्रकारिता दिनानिमित्त 'बातमी लेखन कार्यशाळा' दिनांक ०७ जानेवारी, २०२३ रोजी आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचा विषय बातमी लेखनाचे प्रकार आणि स्वरूप असा होता. प्रमुख वक्ते डॉ. विलास नांदुरकर (जनसंपर्क अधिकारी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ) यांनी बातमी लेखन यावर उत्कृष्ट मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे अध्यक्ष डॉ. बी. बी. चिखले (समन्वयक, CSMT & M) होते. तर

१	२	३
		कार्यशाळेचे आयोजन एम. ए. आजीवन अध्ययन आणि विस्तार अभ्यासक्रमद्वारे करण्यात आले होते.
१४.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	राजमाता जिजाऊ जयंती कार्यक्रम दिनांक १२ जाने, २०२३ डॉ. श्रीकांत पाटील संचालक, DLLE यांच्या अध्यक्षतेखाली साजरी करण्यात आली होती. वक्ते म्हणून यांनी मार्गदर्शन केले. जयंती कार्यक्रमाचे आयोजन एम. ए. योगाशास्त्र अभ्यासक्रम द्वारे करण्यात आले होते. यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे नेतृत्व आणि प्रशासन कौशल्य या अनुषंगाने विचार मांडले होते.
१५.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	हिवाळी परीक्षा - २०२२ दिनांक : ११ ते १९ जानेवारी, २०२३ सेमीस्टर क्रमांक - I & III ची हिवाळी २०२२ परीक्षा आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागातील पदवी आणि पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी विविध केंद्रावर अभ्यासपूर्वक पार पडली.
१६.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	'सूर्यनमस्कार आठवडा' दिनांक : २३ ते २८ जानेवारी, २०२३ दरम्यान मधे साजरा करण्यात आला. याचे अध्यक्ष डॉ. विजयकुमार चौबे (प्र. कुलगुरू संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ) होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. तुषार देशमुख (कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ) यांचीही उपस्थिती प्रामुख्याने होती. याचे आयोजक म्हणून १) डॉ. श्रीकांत पाटील (संचालक, DLLE) आणि २) डॉ. अविनाश असनारे (संचालक, खेळ आणि शारीरिक शिक्षण व रंजन विभाग) यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली होती. एम ए. योगशास्त्र, : पी. जी. डिप्लोमा इन योगथेरेपी, पी.जी. डिप्लोमा इन योगा अँड नॅचरोपॅथी यांच्या संयुक्त विद्यमाने शारीरिक शिक्षण व रंजन विभागाचे मैदानावर सूर्यनमस्कार आठवडा चे आयोजन करण्याचा उद्देश आरोग्य विषयक जागृती विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे होता.
१७.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग मंडळाची सभा दिनांक : २७ जाने, २०२३ ला संपन्न झाली. सभेत या विषयावर चर्चा करण्यात आली. सभेचे अध्यक्ष डॉ. विजयकुमार चौबे (प्र - कुलगुरू, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ) तर सभेचे सचिव डॉ. श्रीकांत पाटील (संचालक : DLLE) म्हणून कार्य केले. सभेला उपस्थित सदस्य मध्ये १) डॉ. मोना चिमोटे, २) डॉ. संजय खडसे ३) प्रा. ज्ञानेश्वर गटकर

१	२	३
१८.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	पंडित दीनदयाल उपाध्याय विभागीय रोजगार मेळावा दिनाक ११ फेब्रुवारी, २०२३ डॉ. के. जी. देशमुख सभागृहात श्री काळबांडे विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. रोजगार मेळाव्याचे उद्घाटन : डॉ. श्रीकांत पाटील (संचालक आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग) यांनी केले होते. विचारमंचावर श्रीमती. अंजली बारस्कर (सहा. उपायुक्त, जिल्हा अमरावती) विद्यार्थी विकास विभागाचे संचालक, डॉ. बोरकर, डॉ. जी. एल. गुल्हाने, आणि श्री. आनंद मंजरखेडे होते. मान्यवर उपस्थित होते. रोजगार मेळाव्याचे आयोजन कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागीय आयुक्तालय अमरावती आणि आजीवन अध्ययन विस्तार विभाग व विद्यार्थी विकास विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. एकूण ८०६ पदाकरिता १५०० विद्यार्थिनी अमरावती विभागातून रोजगार प्राप्तीकरिता यादरम्यान मुलाखती घेण्यात आल्या होत्या.
१९.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	शिवजयंती निमित्त 'शस्त्र प्रदर्शनी' दिनांक २०/०२/२०२३ रोजी डॉ. श्रीकांत पाटील (संचालक, DLLE) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. शस्त्र प्रदर्शनीचे उद्घाटक आणि प्रमुख वक्ते प्रा. घनश्याम दाणे (भारतीय महाविद्यालय, मोर्शी) तर प्रमुख अतिथी : श्री शिवा श्रीकृष्ण काळे (शिव अभ्यासक) यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे आयोजक : एम. ए. छत्रपती शिवाजी महाराज विचारधारा आणि व्यवस्थापन यांनी केले. अमरावती शहरातील महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच विद्यापीठातील अन्य विभागातील १५० विद्यार्थी आणि प्राध्यापक यांनी शस्त्र प्रदर्शनीला भेट दिली होती. स्थळ : आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग येथे होते.
२०.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	दिनांक २ फेब्रुवारी, २०२३ रोजी "Schizophrenia and phychosis" विषयावर मानसोपचार तज्ञ डॉ. अमोल गुल्हाने (MBBS, DPM) यांचे अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानातून त्यांनी संबंधित मानसिक रोगावरची कारणे व जबाबदार घटक याविषयी विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे आयोजन अध्यक्ष डॉ. श्रीकांत पाटील (संचालक आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली एम. ए. समुपदेशन आणि मानसोपचार पद्धती अभ्यासक्रमद्वारे करण्यात आले होते.

१	२	३
२१.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	दिनांक ४, ५ मार्च २०२३ रोजी पी. जी. डिप्लोमा निसर्गोपचार आणि योगविज्ञान अभ्यासक्रमद्वारे "Workshop on Yoga Therapy" चे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेस प्रशिक्षक म्हणून डॉ. सूर्यकांत पाटील (विभाग प्रमुख योगा आणि DCPE, HVPM अमरावती) यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळाले. या कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. श्रीकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते.
२२.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	दिनांक ०४ मार्च रोजी 'Emerging Trends in Counseling' या विषयावर अतिथी व्याख्यान संपन्न झाले. प्रमुख वक्ते प्रा. विलास पाध्ये (विभाग प्रमुख मानसोपचार एल्फिन्स्टन कॉलेज मुंबई,) यांनी मार्गदर्शन केले होते. समुपदेशन हे एक प्रकारचे आव्हान असून समुपदेशकांनी स्वतःला तयार करावे. दिनांक ९ डिसेंबर २०२२ रोजी माननीय सिस्टर रोजलिमा संचालिका दिव्य सदन सेंटर वडाळी यांनी या ठिकाणी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले होते. विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एम. ए. समुपदेशन मानसोपचार अभ्यासक्रमद्वारे या अतिथी व्याख्यान आयोजित केले होते.
२३.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	दिनांक ०८ मार्च २०२३ रोजी जागतिक महिला दिन यशस्वीपणे साजरा करण्यात आला. प्रा. शुभांगी रवाळे यांच्या अध्यक्षते खाली तसेच प्रा. मंजुषा बारबुधे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला होता. आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग द्वारे जागतिक महिला दिनाचे आयोजन करण्यात आले होते.
२४.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	दिनांक ०९ मार्च २०२३ रोजी Stress management and yoga विषयावर प्रमुख वक्ते डॉ. प्रियांका शेळके (MBBS, MSc. DRSW, PGDN) यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. श्रीकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एम. ए. योगशास्त्र अभ्यासक्रम द्वारे करण्यात आले होते.
२५.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	दिनांक १० मार्च, २०२३ रोजी योगा अँड इंटीमेट योग साधना या विषयावर डॉ. साधना दानेरिया (विभाग प्रमुख योगा विभाग, भरकतुला विद्यापीठ मध्य प्रदेश) यांनी मार्गदर्शन केले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ श्रीकांत पाटील (संचालक आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.

१	२	३
२६.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	दिनांक १३ मार्च २०२३ रोजी 'Yoga Nidra & Modern Relaxation Technique' विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन विभागाचे संचालक डॉ श्रीकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एम. ए. योगा अभ्यासक्रमद्वारे करण्यात आले होते.
२७.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	दिनांक १४,१५ मार्च रोजी 'Program is Lifesaver in Modern Age' या विषयावर प्रो. सुप्रिया चाकोले, (विध्यावल्ले स्कूल पुणे), 'Role of Research in Yoga' या विषयावर डॉ. पी आर राजपूत (माझी प्राचार्य, SSSRC कारंजा लाड) यांचे अतिथी व्याख्यान आयोजन करण्यात आले होते. विभागाचे संचालक डॉ श्रीकांत पाटील यांनी या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले होते. तर अतिथी व्याख्यान चे आयोजन एम. ए. योगा अभ्यासक्रमद्वारे करण्यात आले होते.
२८.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	दिनांक १५ मार्च २०२३ रोजी 'Importance of Antaranga' या विषयावर डॉ. प्रिया पाटील (योगा ब्रँड ॲम्बेसेडर महाराष्ट्र राज्य) यांनी प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन केले होते. 'व्यक्तीने अंतरंगाचा विकास केल्यास जीवन सुदंर होईल.' असे मत त्यांनी व्यक्त केले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान डॉ. श्रीकांत पाटील यांनी भूषविले होते.
२९.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	दिनाक १७ मार्च २०२३ रोजी 'Differant Types of Diet' विषयावर डॉ. प्रवीण अनासने (सहा. प्रा. योगा विभाग, HVPM अमरावती) यांनी प्रमुख वक्तेम्हणून मार्गदर्शन करताना 'आहाराचे विविध प्रकार असून आणि त्यापैकी शाकाहार व्यक्तीचे आरोग्य चांगले राहण्यासाठी दिनचर्येत मदत करतो' असे व्यक्त केले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. श्रीकांत पाटील (संचालक आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग) यांनी भूषविले होते.
३०.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	दिनांक ६ मार्च २०२३ रोजी. कौटुंबिक न्यायालय अमरावती येथे आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागातील एम. ए. समुपदेशन आणि मानसोपचार अभ्यासक्रम विद्यार्थ्यांची अभ्यास भेट देण्यात आली होती. अभ्यास भेटीचा उद्देश समुपदेशक विद्यार्थ्यांना कौटुंबिक न्यायालयातील समुपदेशन प्रक्रिया याप्रद्दल माहिती देणे होता. समुपदेशक श्री. संजय तेलरांधे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कुटुंब व्यवस्था टिकवून ठेवणे हे आजच्या समुपदेशकासमोरील मोठे आव्हान आहे. यासाठी भावी समुपदेशकांनी स्वतः मध्ये पात्रता निर्माण

१	२	३
		करावी.' संचालक डॉ श्रीकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विभागातील प्रा. मनीषा लाकडे यांच्या नेतृत्वाखाली अभ्यास भेटीचे नियोजन करण्यात आले होते.
३१.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	दिव्य सदन सोशल सेंटर वडाळी येथे दि. ०९ डिसेंबर २०२३ रोजी एम. ए. आजीवन अध्ययन आणि विस्तार अभ्यासक्रम द्वारे अभ्यास भेटीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी मा. सिस्टर रोजलीन यांनी मार्गदर्शन केले.
३२.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	पी.जी. डिप्लोमा इन नॅचरोपॅथी ॲन्ड योगिक सायन्स आणि पी.जी.डिप्लोमा योगा थेरपी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २८मार्च २०२३ रोजी डॉ. श्रीकांत पाटील (संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली सुजोग थेरपी कार्यशाळा संपन्न झाली याकार्यशाळेला प्रशिक्षक म्हणून डॉ. आशिष राठी यांनी उपस्थित होते.

*****

१०) विद्यापीठ आरोग्य केंद्र

१) विद्यापीठ आरोग्य केंद्राकरिता शासनाकडून आरोग्य अधिकारी -१, आरोग्य परिचर - १ या प्रमाणे पदे मंजूर असून त्या पदावर सद्यस्थितीत खालील अधिकारी / कर्मचारी कार्यरत आहेत.
   १. डॉ.स्मिता मधुकर थोरात, आरोग्य अधिकारी
   २. श्री. सचिन उमाकांत बाळापुरे, आरोग्य परिचर

२) विद्यापीठ आरोग्य केंद्रात अहवालाच्या कालावधीत २५०२ शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी यांनी सुविधेचा लाभ घेतलेला आहे.

३) अहवाल वर्षात आरोग्य केंद्रातर्फे

   (१) विद्यापीठात कार्यरत महिला अधिकारी, कर्मचारी, शिक्षिका ह्यांच्याकरिता मार्गदर्शन व मोफत स्त्रीरोग तपासणी शिबिराचे आयोजन दि. ३० जुलै, २०२२ रोजी आरोग्य केंद्राद्वारे करण्यात आले. यामध्ये बी.पी., शुगर, ब्रेस्ट एक्झाम, गर्भ पिशवीच्या मुखाची तपासणी, थ्रोट एक्झाम, या चाचण्या करण्यात आलेल्या असून एकूण १२५ महिलांनी शिबिराचा लाभ घेतला.

   (२) वसतिगृहात प्रवेशित विद्यार्थिनींचे मोफत हिमोग्लोबीन तपासणी शिबिर व योग्य टॉनिक वितरण कार्यक्रम घेण्यात आला. एकूण १५५ मुलींचे हिमोग्लोबीन चाचणी करण्यात आली. दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२२ ला या शिबिराचे आयोजन करण्यात आलेले होते.

   (३) युवा महोत्सव येथे प्रथमोपचार व ॲम्बुलन्स सुविधा पुरविण्यात आली.

(४) पश्चिम विभाग महिलांची हॉलीबॉल टुर्नामेंट, महिलांचे कबड्डी सामने, ॲथलेट्स मीट या सामन्यांमध्ये प्रथमोपचार व ॲम्बुलन्स सुविधा पुरविण्यात आली.

(५) दिनांक २० जानेवारी, २०२३ ला विद्यापीठात कार्यरत अधिकारी, कर्मचारी ह्यांच्याकरिता आरोग्य जनजागृती कार्यक्रम अंतर्गत मधुमेह जनजागृती व आहार व्यवस्थापन याबाबत उद्‌बोधन कार्यक्रम घेण्यात आला.

(६) दिनांक ०४ मार्च, २०२३ रोजी पदव्युत्तर शिक्षण विभागातील प्रशिक्षणार्थी, विद्यार्थी, विद्यार्थिनींकरिता दंत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

(७) समता सप्ताह कार्यक्रमांमध्ये आरोग्य केंद्राद्वारे प्रथमोपचार व आवश्यकता पडल्यास ॲम्बुलन्सची सुविधा पुरविण्यात आली. तसेच दीक्षांत समारंभामध्ये प्रथमोपचार व ॲम्बुलन्स सुविधा पुरविण्यात आली.

******

११) विद्यापीठ वसतिगृह (मुलींचे व मुलांचे)

अ.क्र.	विवरण	एकूण विद्यार्थी	
		मुले	मुली
१.	वसतिगृह क्र. १	२४	८२
२.	वसतिगृह क्र. २ (मागासवर्गीय)	११३	१०१
३.	वसतिगृह क्र. ३	९९	६१
४.	वसतिगृह क्र. ४	- -	२५
	एकूण	**२३६**	**२६९**

******

१२) नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य

- **'इनोव्हेशन व्हॅलिडेशन आणि स्टार्ट-अप एक्सलरेशन' वर आयोजित वेबिनारः**

  नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, एस.जी.बी.ए.यू. रिसर्च अँड इनक्युबेशन फाउंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १४ ऑगस्ट २०२२ रोजी 'इनोव्हेशन व्हॅलिडेशन आणि स्टार्ट-अप एक्सलरेशन' या विषयावर एस.जी.बी.ए.यू. रिसर्च अँड इनक्युबेशन फाउंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते.

  प्रमुख पाहुणे व वक्ते श्री. मयूर झंवर, सीईओ, ट्रु-स्कॉलर, अमरावती, यांनी इनोव्हेशन व्हॅलिडेशनसाठी ''कन्व्हर्टिंगइनोव्हेशनइनस्टार्ट-अप'' या विषयावर अनमोल मार्गदर्शन केले आणि दुसरे प्रमुख पाहुणे आणि वक्ते श्री. अजय गिर्हे, स्टार्ट-अप एक्सलरेशन, नागपूर यांनी स्टार्ट-अप एक्सलरेशनसाठी ''स्टार्ट-अप इकोसिस्टम सक्षम'' वर अनमोल मार्गदर्शन केले.

  या प्रसंगी डॉ. तुषार देशमुख कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, डॉ. व्ही. एम. ठाकरे विभाग प्रमुख आणि सह-संयोजक, संगणकशास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांनी मोलाचे सहकार्य केले. तसेच डॉ. स्वाती एस. शेरेकर संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांनी मार्गदर्शन केले. या वेबिनारला सुमारे शेकडो विद्यार्थ्यांनी हजेरी लावली आणि त्यांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

  प्रा. डॉ. स्वाती एस. शेरेकर, संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती ह्या या कार्यक्रमाच्या निमंत्रक होत्या. वेबिनार यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्यच्या टीमने अथक परिश्रम घेतले.

- **''रिपॉझिटरीज ऑफ स्टार्ट-अप''वर आयोजित वेबिनार:**

  नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, एस.जी.बी.ए.यु. रिसर्च अँड इनक्युबेशन फाऊंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १६ ऑगस्ट, २०२२ रोजी ''रिपॉझिटरीज ऑफस्टार्ट-अप'' या वेबिनारचे एस.जी.बी.ए.यु. रिसर्च अँड इनक्युबेशन फाऊंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे आयोजन करण्यात आले होते. वेबिनारचे प्रमुख पाहुणे आणि वक्ते डॉ. अनिरुद्ध शेलोटकर संस्थापक संचालक, माय ॲडव्होकसी कन्सल्टंट्स, अमरावती यांनी ''बिग डेटाव्हिज्युअलायझेशन'' याविषयावर अनमोल मार्गदर्शन केले.

  डॉ दिलीप मालखेडे माननीय कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती. तसेच सन्माननीय अतिथी डॉ.व्ही. एस. चौबे, प्र-कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांनी या वेबिनारच्या आयोजनासाठी आम्हाला मार्गदर्शन केले. डॉ. तुषार देशमुख कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, डॉ. व्ही. एम. ठाकरे विभाग प्रमुख आणि सह-संयोजक, संगणकशास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती आणि डॉ.स्वाती एस. शेरेकर संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या वेबिनारला सुमारे शेकडो विद्यार्थ्यांनी हजेरी लावली आणि त्यांचा उदंड प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाच्या निमंत्रक प्रा. डॉ. स्वाती एस. शेरेकर, संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती ह्या होत्या. वेबिनार यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्यच्या टीमने अथक परिश्रम घेतले.

- **महाराष्ट्र राज्य इन्क्युबेशन सोसायटी स्टार्टअप यात्रे आयोजन :**

स्टार्ट-अप्सबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी, सरकारी योजनांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि पिचिंग संधी उपलब्ध करण्यासाठीनवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती आणि एस.जी.बी.ए.यू. रिसर्च अँड इनक्युबेशन फाऊंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २० ऑगस्ट, २०२२ रोजी एस.जी.बी.ए.यू. रिसर्च अँड इनक्युबेशन फाउंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे ''महाराष्ट्र राज्य इन्क्युबेशन सोसायटी स्टार्टअप यात्रा (जागरूकता शिबीर कार्यक्रम)'' चे आयोजन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी स्टार्टअप यात्रा (जागृती शिबिर कार्यक्रम) आयोजित करण्यात आली होती. या यात्रेला सर्व विभागाचे विभाग प्रमुख व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून त्यांनी या यात्रेला मोठा प्रतिसाद दिला.

''महाराष्ट्र राज्य इन्क्युबेशन सोसायटी स्टार्टअप यात्रा (जागरूकताशिबीर कार्यक्रम)'' यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्रा.डॉ. स्वाती शेरेकर, संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती आणि त्यांच्या टीमने प्रयत्न केले.

- **''महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी स्टार्टअप यात्रा'' आयोजित :**

एस.जी.बी.ए.यू. रिसर्च अँड इनक्युबेशन फाऊंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती आणि कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नवोपक्रम विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १४ ऑक्टोबर, २०२२ रोजी एस.जी.बी.ए.यू. रिसर्च अँड इनक्युबेशन फाऊंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे "महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी स्टार्टअप यात्रा" मध्ये बूट कॅम्प आणि पिचिंग इव्हेंट आयोजित करण्यात आले आहे.

''महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी स्टार्टअप यात्रा'' मध्ये बूट कॅम्प व पिचिंग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आणि श्रीमती पवनीत कौर माननीय जिल्हाधिकारी, अमरावती विभाग, अमरावती यांच्या हस्ते रिबन कापून या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. व्ही. एस. चौबे, प्र-कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, डॉ. व्ही. एम. ठाकरे विभाग प्रमुख, संगणकशास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, डॉ. स्वाती एस. शेरेकर संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती आणि संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

''महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी स्टार्टअप यात्रा'' मधील स्पर्धकांना पारितोषिक व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. ''महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी स्टार्टअप यात्रा'' मध्ये बूट कॅम्प व पिचिंग कार्यक्रमास सुमारे १०० विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात सहभाग घेतला आणि त्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

''महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी स्टार्टअप यात्रा'' यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्रा. डॉ. स्वाती शेरेकर, संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती आणि त्यांच्या टीमने अथक प्रयत्न केले.

- **राष्ट्रीय नवोपक्रमदिन-२०२२ आणि प्रेरणा सत्र आयोजितः**

नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य,संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, आणि एस.जी.बी.ए.यू. रिसर्च अँड इनक्युबेशन फाऊंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती २१ ऑक्टोबर, २०२२ ही ''राष्ट्रीय नवोपक्रम दिन'' म्हणून साजरी करण्यात येते.

याप्रसंगी डॉ. व्ही. एम. ठाकरे विभाग प्रमुख, संगणकशास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती आणि प्रा. डॉ. एस. व्ही. डुडुल अधिष्ठाता, विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखा, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, यांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमासाठी डॉ. तुषार देशमुख कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, आणि डॉ. स्वाती एस. शेरेकर, संचालक व संयोजक, नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

सदर कार्यक्रमात निमंत्रित वक्ते श्री. प्रफुल्ल शेळके, सहाय्यक आयुक्त, अमरावती यांनी ''कौशल्य, रोजगार आणि उद्योजकता'' या विषयावर मार्गदर्शन केले आणि तरुण उद्योजक श्री. वैभव बोरकर यांनी त्यांचे अनुभव सांगितले तसेच नवीन कल्पनांचा तरुण पिढीला उद्योजक बनण्यासाठी कसा फायदा होईल हे विषद केले. प्रा.डॉ.एस. व्ही. डुडुल अधिष्ठाता, विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखा, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांनी प्रेरक सत्रात 'समस्या सोडवणे आणि विचारसरणी' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले.

''राष्ट्रीय नवोपक्रम दिन २०२२ आणि प्रेरणासत्र'' मध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या सहभागाला न्याय देऊन बक्षिसे आणि प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या दरम्यान मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आणि त्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

'राष्ट्रीय नवोपक्रम दिन २०२२ आणि प्रेरणा सत्र' यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्रा. डॉ. स्वाती शेरेकर, संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य,संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती आणि त्यांच्या टीमने अथक प्रयत्न केले.

''डिझाईन थिंकिंग, क्रिटिकल थिंकिंग आणि इनोव्हेशन डिझाईन'' वर कार्यशाळाः

नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, गणित विभाग. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती आणि सांख्यिकी विभाग, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती आणि एस.जी.बी.ए.यू. रिसर्च अँड इनक्युबेशन फाउंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने गणित विभागात दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजी ''डिझाईन थिंकिंग, क्रिटिकल थिंकिंग आणि इनोव्हेशन डिझाईन'' याविषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

डॉ. व्ही. एस. चौबे, प्र-कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, तर प्रमुख अतिथी प्रा. डॉ. एस. व्ही. डुडुल अधिष्ठाता, विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखा, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती आणि डॉ. तुषार देशमुख कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या कार्यशाळेत प्रा. डॉ. स्वाती एस. शेरेकर संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य,संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती हे वक्ते होते. आपल्या ध्येयाच्या दिशेने आपली विचार करण्याची क्षमता कशी वाधवायची याबद्दल त्यांनी माहीती दिली. समस्या शोधणे आणि त्या नाविन्यपूर्ण मार्गांनी कशा सोडवाव्या यावर त्यांनी विस्तृत विवेचन केले. या कार्यशाळेला सुमारे १०० विद्यार्थी उपस्थित असून त्यापैकी बहुतांष अध्यापन विभागातील पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थी होते आणि त्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

या कार्यक्रमाचे निमंत्रक श्री. अक्षय देठे होते. सूत्रसंचालन श्री. अंकुश पी. निळे समन्वयक आणि श्री.एस.डी. रामटेके यांनी सचिव म्हणून काम पाहिले.

- **"विद्यापीठ आणि उद्योग साहचर्य" वर आयोजित कार्यक्रमः**

नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य, संत गाडगे फ्राफ्रा अमरावती विद्यापीठ, अमरावती, एस.जी.बी.ए.यू. रिसर्च अँड इनक्युबेशन फाऊंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती आणि जैवतंत्रज्ञान विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १७ आणि १८ फेब्रुवारी, २०२३ रोजी "विद्यापीठ आणि उद्योग यांच्यातील साहचर्य" या विषयावर दोन दिवसीय कार्यक्रम जैवतंत्रज्ञान विभागात आयोजित केला होता.

"इंडस्ट्री मीट" कार्यक्रमात प्रमुख पाहुणे डॉ. आशिष सहाय संचालक, व्हायरल व्हॅक्सीन, सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया, पुणे हे होते. त्यांच्या मते, लोकांसाठी आवश्यक असलेल्या गोष्टींचा विकास आणि निर्मिती करण्यासाठी विद्यापीठ आणि उद्योग यांच्यातील समन्वय साधने आवश्यक आहेत. आपल्या मुख्य भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना उद्योजक म्हणून करिअर करण्यासाठी प्रोत्साहित केले आणि यशस्वी भविष्य सुनिश्चित करण्यासाठी संशोधनाच्या महत्त्वावर भर दिला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावतीचे प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगावकर होते. ते म्हणाले, 'आजचे विद्यार्थी खूप हुशार आहेत आणि काहीतरी नवीन करण्याचा प्रयत्न करतात.' तसेच ते पुढे म्हणाले की, या टप्प्यावर तरूणांनी या वस्तुस्थितीचा विचार करणे आवश्यक आहे की, आपण तंत्रज्ञानासाठी इतर देशांवर अवलंबून राहू नये आणि परिस्थिती सुधारण्यासाठी आपल्याला काम करावे लागेल. या प्रसंगी प्रा. डॉ. स्वाती एस. शेरेकर संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती; डॉ. गणेश कुमारज व्यवस्थापकीय संचालक, बायोब्रेंझ हेल्थकेअर सोल्युशन्स प्रा. लिमिटेड, पुणे आणि चंदीगड; डॉ. दिलीप मोंढे प्रमुख संशोधक, कर्करोग फार्माकोलॉजी, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इंटिग्रेटिव्ह मेडिसिन, जम्मू; डॉ. श्रीकांत पवार, महाव्यवस्थापक, स्क्रोलॉजी आणि मॅक्रोबायोम, मायलॅब डिस्कव्हरी सोल्युशन्स प्रा. लिमिटेड, पुणे आणि डॉ. सुनील कांबळे विक्री व्यवस्थापक, मायलॅब डिस्कव्हरी सोल्युशन्स प्रा. लि. यांची उपस्थिती लाभली व त्यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

जैवतंत्रज्ञान विभागातील पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी आयोजित या सत्रात १०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. सदर कार्यक्रम योग्य रीतीने पार पाडण्यासाठी सर्व समितीने अथक परिश्रम घेतले.

- **"महिलादिन"साजराः**

नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, पदव्युत्तर सांख्यिकी विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती आणि एस.जी.बी.ए.यू. रिसर्च अँड इनक्युबेशन फाऊंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने पदव्युत्तर सांख्यिकी विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे दिनांक ८ मार्च, २०२३ रोजी "महिला दिन" साजरा करण्यात आला.

प्रा. डॉ. स्वाती एस. शेरेकर संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली "महिलादिन" साजरा करण्यात आला. युवामहिला उद्योजिका श्रीमती तृप्ती निमकर व्यवस्थापकिय संचालक, पिंकरोझ प्रा. लि. ह्या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या, त्यांनी आपल्या उद्योजकतेच्या प्रवासाची माहिती विद्यार्थ्यांना दिली आणि आपले अनुभव सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना उद्दोजकतेकरीता प्रेरीत केले. तसेच श्री. अभय तायडे, श्रीमती वैष्णवी चिरडे, श्रीमती रिया ठाकूर, आणि श्री. स्रषिकेश बांबल, यांनी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

विद्यापीठातील पदव्युत्तर विभागातील ६० हून अधिक विद्यार्थ्यांनी 'महिला दिन' कार्यक्रमाला हजेरी लावली आणि कार्यक्रमाचा लाभ घेतला. सदर कार्यक्रम योग्य रीतीने पार पाडण्यासाठी श्री.मनीष देशमुख, श्री. ए. आय.देठे व श्री. अंकुश पी. निळे यांचे बहुमोल सहकार्य मिळाले.

- **"बौद्धिक संपदा अधिकार (IPR)" वर आयोजित कार्यशाळा:**

नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती आणि एस.जी.बी.ए.यू. रिसर्च अँड इन्क्युबेशन फाऊंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळेचे आयोजन आले आहे. दिनांक १५ एप्रिल, २०२३ रोजी "बौद्धिक संपदाहक्क(IPR)" याविषयावर एस.जी.बी.ए.यू. रिसर्च अँड इन्क्युबेशन फाऊंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आली आहे.

प्रा. डॉ. स्वाती एस. शेरेकर संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली "बौद्धिकसंपदाहक्क (IPR)"ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना बौद्धिकसंपदाहक्क (IPR) आणि इनक्यूबेटरची माहिती दिली. प्रमुख पाहुणे व वक्ते श्रीमती योगिता पवार, पेटंट असोसिएट आणि NIPAMट्रेनर, अमरावती यांनी विद्यार्थ्यांना बौद्धिक संपदा हक्क (IPR) संबंधित नोंदणी कशी करावी तसेच बौद्धिकसंपदाहक्क (IPR) बाबतचे महत्व विषद केले. यावेळी डॉ. तुषार देशमुख कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती हे उपस्थित होते.

श्री. अमोल ए. हिरूलकर, व्यवसाय व्यवस्थापक, एस.जी.बी.ए.यू. रिसर्च अँड इन्क्युबेशन फाऊंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांनी कार्यशाळेचे संचालन केले. विद्यापीठीताल पदव्युत्तर विभागातील तसेच विद्यापीठातील संलग्नित महाविद्यालयातील २०० हून अधिक विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाला ऑनलाइन हजेरी लावली आणि त्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

- **"बौद्धिकसंपदाहक्क" या विषयावर आयोजित एकदिवसीय वेबिनार:**

नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती आणि एस.जी.बी.ए.यू. रिसर्च अँड इन्क्युबेशन फाऊंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, जी. एस. विज्ञान, कला आणि वाणिज्य महाविद्यालय, खामगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आणि उद्योग आणि अंतर्गत व्यापार आणि वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या प्रोत्साहनासाठी NIPAM यांच्या पुढाकाराने दिनांक २६ मार्च, २०२३ रोजी "बौद्धिक संपदा हक्क" या विषयावर ऑनलाइन पद्धतीने वेबिनार आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचा उद्देश संशोधक आणि स्टार्ट-अप यांना "बौद्धिक संपदा हक्क (IPR)" मध्ये बौद्धिक संपदा हक्काबद्दल जागरूकता निर्माण करणे हा होता. जेणेकरून विद्यापीठ आणि महाविद्यालयांमधील प्रत्येकाला बौद्धिक संपदा अधिकारांबद्दल माहिती असावी व ते त्यांचे संशोधन किंवा नवकल्पना संरक्षित करू शकतील.

या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रा.डॉ.स्वाती एस. शेरेकर संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या हस्ते झाले. तर निमंत्रक डॉ. डी. एस. तळवणकर, प्राचार्य, जी. एस. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.कार्यक्रमासाठी आमंत्रित अतिथी व्याख्यात्या श्रीमती योगिता पवार पेटंट विश्लेषण आणि NIPAM ट्रेनर यांनी संशोधकांना तसेच इतर सहभागींना मार्गदर्शन केले. पेटंट, कॉपीराइट, ट्रेडमार्क, त्यांचा वापर कसा करायचा अशा विविध प्रश्नांवर त्यांनी बहुमोल माहिती व मार्गदर्शन केले. त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला आणि त्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली.

तसेच प्रा. डॉ. स्वाती एस. शेरेकर संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांनी प्रास्ताविक केले आणि सहभागींना इन्क्युबेशन सेंटर व बौद्धिक संपदा हक्क (IPR) बद्दलची माहिती दिली. या ऑनलाइन कार्यक्रमात १४२ हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.

या कार्यक्रमाचे संयोजक डॉ. पी. ई. अजमिरे, जी. एस. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव होते. कार्यक्रमाची सांगता डॉ. पी. ई. अजमिरे यांच्या आभार प्रदर्शनाने आणि सत्र अध्यक्षांच्या झाली.

"बौद्धिक संपदा जागरूकता कार्यक्रम" वर एक दिवसीय वेब्रिनार आयोजितः

तांत्रिक दिनाच्या निमित्ताने, नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, एस.जी.बी.ए.यू. रिसर्च अँड इन्क्युबेशन फाऊंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती आणि NIPAM, (उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभाग आणि वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय) यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २७ एप्रिल, २०२३ रोजी ऑनलाइन पद्धतीने "बौद्धिक संपदा जागरूकता कार्यक्रम" वर एक दिवसीय वेबिनारआयोजित केला होता. या तांत्रिक दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना बौद्धिक संपदा अधिकारांची माहिती मिळते. विद्यापीठ आणि महाविद्यालयांमधील प्रत्येकाला बौद्धिक संपदा हक्कांबद्दल जागरुक करणे हा या मागचा उद्देश आहे. जेणेकरून ते त्यांचे संशोधन किंवा नवकल्पना संरक्षित करू शकतील.

या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रा. डॉ. स्वाती एस. शेरेकर संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या हस्ते झाले आणि अध्यक्ष डॉ. एस.पी. देशपांडे, प्राचार्य डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

डॉ. एम. एस. चेंडके, उप-प्राचार्य, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती यांनी प्रास्ताविकात बौद्धिक संपदा हक्कांचे महत्त्व आणि फायदे याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी निमंत्रित अतिथी व्याख्यात्या श्रीमती योगिता पवार पेटंट असोसिएट, पेटंट विश्लेषण आणि NIPAM प्रशिक्षक यांनी संशोधकांना तसेच इतर सहभागींना मार्गदर्शन केले. पेटंट, कॉपीराइट, ट्रेडमार्क, त्यांचा वापर कसा करायचा, त्यांच्यासाठी काय करणे आवश्यक आहे, अशा विविध प्रश्नांवर त्यांनी मौल्यवान माहिती आणि मार्गदर्शन केले. त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला आणि त्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली.

तसेच प्रा. डॉ. स्वाती एस. शेरेकर संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांनी प्रास्ताविक केले आणि इन्क्युबेशन सेंटर व बौद्धिक संपदा हक्क (IPR) बद्दलची माहिती दिली. या ऑनलाइन कार्यक्रमात १६० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभागी नोंदविला. श्रीमती दीपा पी. वैद्य, संगणकशास्त्र विभागप्रमुख, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती ह्या या कार्यक्रमाच्या समन्वयक होत्या. प्रा.मोहिनी एम. मोहोड, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती यांच्या आभार प्रदर्शनाने आणि सत्र अध्यक्षांच्या परवानगीने कार्यक्रमाची सांगता झाली.

- **"FPO साठी कृषी क्षेत्रात नाविन्यपूर्ण उद्योग उदयास येत आहे." या विषयावर कार्यशाळेचे आयोजन :**

FPO साठी 'कृषी क्षेत्रात नाविन्यपूर्ण उद्योग उदयास येत आहे' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा दिनांक २३ जून, २०२३ रोजी एस.जी.बी.ए.यू. रिसर्च अँड इन्क्युबेशन फाऊंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे आयोजित करण्यात आली होती, ज्याचे आयोजन संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांनी केले होते. या कार्यक्रमाचा उद्देश शेतकऱ्यांना तसेच विद्यार्थ्यांना कृषी क्षेत्रातील विविध माहिती आणि कल उपलब्ध करून देणे हा होता.

या कार्यक्रमाचे आयोजन प्रा.प्रमोद येवले मा. कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.प्रसाद वाडेगावकर मा. प्र-कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती होते. तसेच प्रा.तुषार देशमुख, मा. कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती हे कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी होते व त्यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमासाठी निमंत्रित अतिथी डॉ. संतोष चव्हाण, संचालक, (R&D) फार्म लॅब पुणे आणि संचालक, जयकिसान शेतकरी गट महाराष्ट्र हे होते. त्यांनी शेतीचा कल आणि उद्योगांना, बायो सेक्टरमध्ये, वेस्ट मॅनेजमेंटमध्ये त्यांची गरज याबद्दल माहिती दिली. अशा प्रकारच्या माहितीचा वापर करून शेतकरी किंवा विद्यार्थी आणि स्टार्ट-अप कृषी क्षेत्रातील नाविन्यपूर्ण आणि असामान्य कल्पना मिळवू शकतात. तसेच संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांनी प्रास्ताविक केले आणि इन्क्युबेशन सेंटरची माहिती उपस्थितांना दिली. या कार्यक्रमात सुमारे ६५ स्पर्धक उपस्थित होते आणि विद्यार्थ्यांना चहा, कॉफी आणि अल्पोपहार प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमाचे समन्वयक श्री अमोल हिरुळकर व्यवसाय व्यवस्थापक, एस.जी.बी.ए.यू. रिसर्च अँड इन्क्युबेशन फाऊंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती हे होते. श्री. आनंद आर. यादव मुख्य कार्यकारी अधिकारी, एस.जी.बी.ए.यू. रिसर्च अँड इन्क्युबेशन फाऊंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या आभार प्रदर्शनाने आणि सत्र अध्यक्षांच्या परवानगीने झाली.

****

१३) उन्नत भारत अभियान

'उन्नत भारत अभियान' हे ग्रामीण भारतातील सर्वांगीण विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने भारत सरकारने सुरू केलेला एक प्रमुख कार्यक्रम आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अधिपत्याखाली स्थापन झालेली विभागीय समन्वय संस्था ही पश्चिम विदर्भातील एक अग्रगण्य संस्था आहे. जी भागीदारी वाढवून, ज्ञानाची देवाणघेवाण करून आणि मराठवाडा आणि विदर्भातील ग्रामीण समुदायांना सक्षम बनवून ग्रामीण विकासासाठी कठोर प्रयत्न करत आहे.

उन्नत भारत अभियान मिशनच्या उद्दिष्टांशी सुसंगत असलेल्या पंचवार्षिक एकात्मिक भविष्यकालीन योजनेच्या शिफारशी लक्षात घेऊन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाअंतर्गत स्थापित विभागीय समन्वय संस्थेने संबंधित विविध सहभागी संस्थांनी पूर्ण केलेल्या गाव सर्वेक्षणाच्या आधारे काही व्यापक समस्या जसे कृषी, जलस्रोत, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, ऊर्जा आणि शालेय शिक्षणातील पटनोंदणी या ओळखल्या आहेत. या आव्हानांचा सामना करण्यासाठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाअंतर्गत स्थापित विभागीय समन्वय संस्थेने पहिल्या टप्प्यात विविध वेबिनार आणि कार्यशाळांच्या माध्यमातून जनजागृती आणि विचारमंथन केले आहे. सोबतच राष्ट्रीय प्रतिष्ठित संस्थांमधील विषय तज्ज्ञ आणि मार्गदर्शकांच्या मदतीने तांत्रिक आणि नावीण्यपूर्ण उपायांना गती देण्यासाठी समर्पित सत्रे आयोजित केली जी केवळ आर्थिक संधीच नव्हे तर ग्रामीण भागातील पर्यावरण संवर्धन आणि जीवनाची गुणवत्ता सुधारणा आणि दीर्घकालीन टिकाऊपणा वाढविण्यासाठी देखील योगदान देतात. शेवटी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील विभागीय समन्वय संस्थेच्या मार्गदर्शनाखाली विविध सहभागी संस्थाद्वारे ३६ (छत्तीस) तांत्रिक विकास आणि सानुकूलित प्रस्ताव सादर केले आहे जे पुढे ग्रामीण समुदाय अनेक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आणि दत्तक गावातील दीर्घकालीन पर्यावरणीय, सामाजिक आणि आर्थिक कल्याणाचा प्रचार करताना ओळलेल्या समस्यांशी संरेखित आहेत.

शिवाय, विभागीय समन्वय संस्था, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती आणि विभागीय समन्वय संस्थेच्या अधिकारक्षेत्राअंतर्गत सहभागी संस्था यांनी राष्ट्रीय समन्वय संस्था, आय.आय.टी., दिल्ली येथे आयोजित केलेल्या विविध कार्यक्रम/बैठक/कार्यशाळेत सक्रिय सहभाग घेतला आहे. विभागीय समन्वय संस्था, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठदेखील आयआयटी, दिल्ली येथे आयोजित 'उन्नती महोत्सव'मध्ये सहभागी झाले होते. या कार्यक्रमादरम्यान, समन्वयक आणि प्रकल्पावर आधारित स्पर्धेसाठी न्यायाधीश म्हणून काम केले.

उन्नत भारत अभियान, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत विभागीय समन्वय संस्थेने केलेले उपक्रम खालीलप्रमाणे :-

- उन्नत भारत अभियान उपक्रमांच्या सुरळित कामकाजासाठी आयोजित बैठकींची संख्या : ०३
- आयोजित कार्यशाळेची संख्या/अभिमुखता कार्यक्रम : ०५
- जून, २०२३ पर्यंत विभागीय समन्वय संस्था अंतर्गत नोंदणीकृत सहभागी संस्थाची संख्या : ९४
- विभागीय समन्वय संस्था अंतर्गत दत्तक गावांची संख्या : ४८०
- विभागीय समन्वय संस्थांच्या मार्गदर्शनाखाली SEG ला सादर केलेल्या प्रकल्पांची संख्या : ३६

उन्नत भारत अभियान, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत भाग घेणाऱ्यो संस्थेने केलेले उपक्रम खालीलप्रमाणे :-

- विभागीय समन्वय संस्थे अंतर्गत दत्तक घेतलेल्या गावांची संख्या : ०५
- गांवसर्वेक्षण पूर्ण : ००
- पूर्ण झालेल्या घरगुती सर्वेक्षणांची संख्या : ००

***

प्रकरण सातवे
आर्थिक बाबी

१) आगम - शोधन

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये विद्यापीठास एकूण निव्वळ आगम रुपये १०४६५४७३८३.२९/- इतके असून निव्वळ शोधन रुपये ८१९२३५९९६.४६/- इतके आहेत. उपरोक्त निव्वळ शोधनाच्या रकमेमध्ये परीक्षा संचालन, इमारत बांधकाम तसेच इतर कामाकरिता दिलेल्या अग्रिमाचा समावेश करण्यात आलेला नाही.

१. राज्य शासनाकडून वेतन अनुदानापोटी २०२२-२३ या आर्थिक वर्षात रुपये ५३६३४५८०५.००/- इतके अनुदान प्राप्त झालेले आहे. प्राप्त अनुदान आणि मागील वर्षातील शिल्लक असलेल्या अनुदानातून मान्यता प्राप्त शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनापोटी रुपये ३२१६१२४०५.००/-इतका खर्च झालेला असून शिक्षकाच्या वेतनापोटी रुपये २०७१३३७५४.००/- इतका खर्च झालेला आहे.

२. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून अहवाल काळात वेतन अनुदान प्राप्त झालेले नाही.

३. विद्यापीठाचे प्रमुख आर्थिक स्रोत हे विद्यार्थ्यांपासून प्राप्त होणारे परीक्षा शुल्क होय. २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये रुपये ४९०१८९१७०.१५/- इतके परीक्षा शुल्क प्राप्त झालेले असून परीक्षेव्यतिरिक्त इतर बाबीपासून प्राप्त झालेले उत्पन्न रुपये ११८०१४९९.०४/- इतके आहे. ज्यामध्ये विद्यार्थ्यांकडून प्राप्त शुल्क रुपये ४४०७१२८३.००/-, महाविद्यालयांकडून प्राप्त शुल्क रुपये २४१६३५६५.००/- विद्यापीठाच्या पदव्युत्तर शैक्षणिक विभागांकडून प्राप्त शुल्क रुपये २६०३५४५३.००/- शा.शिक्षण व रंजन शुल्क रुपये १७७१११९४००/- ठेवींवरील व्याज रुपये २६९१७११९३.००/-, केंद्रीय प्रवेशापासून प्राप्त शुल्क रुपये ११०९७५०.००/- आणि इतर किरकोळ उत्पन्न रुपये ११८०१४९९.०४/- चा समावेश आहे. परीक्षा खर्च रुपये १२९९४८६३१.००/- इतका असून आकस्मिक व्यय रुपये १५९६०८६८५.०३/- इतका आहे. ज्यामध्ये छपाई, लेखन सामुग्री, डाक व तार खर्च, इमारतींची दुरुस्ती व देखभाल, उद्यानातील मजुरांना मजुरी, महानगरपालिकेचा कर, विद्युत व्यय, वाहनांची दुरुस्ती व देखभाल, विद्यापीठाच्या विविध प्राधीकारीणी/ कर्मचारी/अधिकाऱ्यांचा प्रवास खर्च, वृत्तपत्रे-नियतकालिके, दैनिक कामगारांची मजुरी, पदवीदान समारंभ, बगिच्यांची देखभाल इत्यादी समावेश आहे. याशिवाय घसारा निधी रुपये ४४७०९९६४.००/-, निकाय निधी रुपये ००.००/- आणि पदव्युत्तर शैक्षणिक विभागांचा खर्च रुपये ३५५६४५१३.००/- आहे.

४. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानाव्यतिरिक्त साधारण निधीमधून प्रशासकीय विभाग व शैक्षणिक विभागाचे उपस्कर, उपकरणे, इ. करिता रुपये ८१११६००.००/-, इमारत व भांडवली खर्च रुपये १६०३४९९६.००/- आणि पुस्तकांकरिता रुपये १९९१९३.००/- इतका खर्च झालेला आहे.

५. राज्य शासनाकडून इमारत बांधकाम व परिसर विकासाकरिता २०२२-२३ या आर्थिक वर्षात अनुदान प्राप्त झाले नाही.

६. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून २०२२-२३ या आर्थिक वर्षात इमारत बांधकामाकरिता अनुदान प्राप्त झाले नाही. तसेच पुस्तकांकरिता अनुदान प्राप्त झाले नार्ही .

७. केंद्र शासनाकडून २०२२-२३ संशोधन प्रकल्पाकरिता रुपये ८७३६४१६.००/- इतके अनुदान प्राप्त झाले. पूर्वीच्या शिल्लक अनुदानातून रुपये ५३६५१४.००/- इतका खर्च झाला.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठास सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात राज्य शासनाकडून तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाकडून खालीलप्रमाणे वेतन व वेतनेतर अनुदान प्राप्त झालेले आहे.

१) वेतन अनुदान

अ) राज्य शासन

वेतन अनुदान : रुपये ५३६३४७८०५/-

डॉ.श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्र : रुपये निरंक

ब) विद्यापीठ अनुदान आयोग : रुपये निरंक

२) वेतनेतर अनुदान

अ) राज्य शासनाकडून इमारत बांधकाम व परिसर विकासाकरिता अनुदान : रुपये निरंक

ब) राज्य शासनाकडून प्रशासकीय विभाग तथा पदव्युत्तर विभागाकरिता अनुदान : रुपये निरंक

क) संशोधन प्रकल्प (राज्य शासन) : रुपये ३१७८२१२/-

ड) विद्यापीठ अनुदान आयोगाकडून अनुदान : रुपये निरंक

३) केंद्र शासनाकडून अनुदान रुपये ८८३५००.००/-

अ.क्र.	तपशील	२०२१-२२(रुपये)	२०२२-२३(रुपये)
	'अ' आवर्ती		
१)	**राज्य शासन अनुदान**		
अ)	वेतन अनुदान	४३६८६७०७६.००/-	५३६३४७८०५००/-
	मॉडेल डिग्री कॉलेज	निरंक	निरंक
	श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्र	निरंक	निरंक
ब)	वेतनेतर अनुदान(मॉडेल डिग्री कॉलेज)	निरंक	निरंक
क)	अनुदानित विभागाकडून प्राप्त शिक्षण शुल्क	निरंक	निरंक
ड)	राष्ट्रीय विज्ञान दिवस	१००००० .००/-	१००००० .००/-
इ)	राष्ट्रीय विज्ञान दिवस	निरंक	निरंक
२)	**केंद्र व इतर संस्थांकडून अनुदान**		
	१) विद्यापीठ अनुदान आयोग		
अ)	वेतन अनुदान	निरंक	निरंक
ब)	वेतनेतर अनुदान	निरंक	निरंक
	२) केंद्रशासन	निरंक	निरंक
३)	**परीरक्षण**		
अ)	परीक्षा शुल्क	२०९२३०१२४.७६/-	३७८२०७६७५.१५/-
ब)	शिक्षण शुल्क व इतर	२००३३१७४.५०/-	२६०३५४५३.००/-
क)	संकीर्ण	९२६०१४७.५०/-	११८०१४९९.०४/-
४)	**दाननिधी**	निरंक	निरंक
	'अ' आगम	**६७५३९०५२२.७६/-**	**१४९२९०१९४९.१९**

अ.क्र.	तपशील	२०२१-२२(रुपये)	२०२२-२३(रुपये)
	'ब' अनावर्ती		
	१) राज्य शासनाकडून अनुदान		
	अ) पुस्तके	निरंक	निरंक
	ब) उपस्कर,उपकरणे,साहित्य	निरंक	निरंक
	क) भांडवली व इमारत	निरंक	निरंक
	२) विद्यापीठ अनुदान आयोग		
	अ) पुस्तके	निरंक	निरंक
	ब) उपस्कर,उपकरणे,साहित्य	निरंक	निरंक
	क) भांडवली व इमारत	निरंक	निरंक
	३) केंद्र शासनाकडून अनुदान (भांडवली व उपकरणे)	निरंक	निरंक
	पुस्तके	निरंक	निरंक
	'ब' आगम	निरंक	निरंक
	एकूण (अ + ब)	**६७५३९०५२२.७६**	**१४९२९०१९४९.१९**

अ.क्र.	तपशील (शोधन)		२०२१-२२(रुपये)	२०२२-२३(रुपये)
	'अ' आवर्ती			
१)	**आस्थापनेवरील खर्च**	**अ) शिक्षक कर्मचारी**		
		१) राज्य शासन	१६००८२२३०.००/-	१५४५९५८०१.२७/-
		२) विद्यापीठ अनुदान आयोग	निरंक	निरंक
		३) मॉडेल डिग्री कॉलेज	२४४७६६१.००/-	३७६३९४.००/-
		४) डॉ. श्रीकांत जिचकार मेमो. रिसर्च सेंटर	निरंक	निरंक
		ब) शिक्षकेतर कर्मचारी		
		१) राज्य शासन	२६०४२७६.००/-	१५४५९५८०१.२७/-
		२) विद्यापीठ अनुदान आयोग	निरंक	निरंक
		३) केंद्र शासन	निरंक	निरंक
		४) मॉडेल डिग्री कॉलेज	२६९८२२४.००/-	३७६३९४.००/-
		५) साधारण निधी	१४५५२००.००/-	८३४४०६८५.७८/-
		६) डॉ. श्रीकांत जिचकार मेमो. रिसर्च सेंटर	७२०००.००/-	७२०००.००/-
		क) राष्ट्रीय विज्ञान दिवस	१००००००.००/-	१००००००.००/-
		ड) राष्ट्रीय गणित **दिवस**	५००००.००/-	५००००.००/-
		इ) **राज्य शासन आवर्ती खर्च**	निरंक	निरंक

२)	आकस्मिक व्यय	१२१८६२३०९.५६	१५९६०८६८५.००
३)	परीक्षण व्यय	निरंक	६५१०४९.००
४)	परीक्षा व्यय	५०७५८४७८.००	१२९९४८६३१.००
५)	मुद्रण व्यय	२३८३५८५.००	२८३६११८.००
६)	संकिर्ण व्यय	५५९८५९४१.३१	८३४४०६८५.७८
७)	घसारा निधी	५८५२१५६७.००	४६३६७३७७.२२
८)	विद्यापीठ अनुदान आयोग	निरंक	निरंक
९)	दाननिधी	निरंक	निरंक
१०)	केंद्रशासन	१०३२२३७.००	निरंक
	'अ' शोधन	**४०९५१६३६१.३१**	**८६८९९७५७५.०८**

अ.क्र.	**तपशील (शोधन)**	**२०२१-२२**	**२०२२-२३**
	'ब' अनावर्ती		
१)	साधारण निधी		
	अ) पुस्तके	३३१०२३४.००	३३८४३६.००
	ब) उपस्कर,उपकरणे,साहित्य	१३७६७०५८.००	८९६३५४५.००
	क) भांडवली व इमारत खर्च	१३८४०५२२.००	निरंक
२)	**राज्य शासन अनुदान**		
	अ) पुस्तके	निरंक	निरंक
	ब) उपस्कर,उपकरणे,साहित्य	निरंक	निरंक
	क) भांडवली व इमारत खर्च	११३८४०५२२.००	निरंक
३)	**विद्यापीठ अनुदान आयोग**		
	अ) पुस्तके	निरंक	निरंक
	ब) उपस्कर,उपकरणे,साहित्य	निरंक	निरंक
	क) भांडवली व इमारत खर्च	निरंक	निरंक
४)	**केंद्रशासन अनुदान**		
	अ) भांडवली व इमारत खर्च	निरंक	४३९६४५६०.००
	ब) संशोधन प्रकल्प	१०३२२३७.००	३१७८२१२.००
	क) पुस्तके	निरंक	निरंक
	'ब' शोधन	४५७९०५७३.००	५६४४४७५३.००
	एकूण (अ + ब)	**४५५३०६९३४.३१**	**९२५४४२३२८.००**

******

२) शिष्यवृत्ती

अ) सन २०२१-२२ व २०२२-२३ या शैक्षणिक सत्रातील कै.श्री शंकरराव गोविंद जोग व कै.श्रीमती पार्वतीबाई शंकरराव जोग शिष्यवृत्ती.

सदर शिष्यवृत्ती विनियम क्र. ३२/२००७ प्रमाणे प्रदान करण्यात येते.

3. iv) a) प्रमाणे प्रथम वर्ष भाग-१ ला पदार्थ विज्ञान हा विषय घेऊन प्रवेशित झालेल्या व उच्च माध्यमिक शालांत परीक्षेमध्ये (उन्हाळी)पदार्थ विज्ञान या विषयात सर्वाधिक गुण प्राप्त करून प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यास रु. ५००/- शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते.

b) व c) प्रमाणे अनुक्रमे विज्ञान स्नातक भाग-१ व विज्ञान स्नातक भाग-२ च्या उन्हाळी परीक्षेत पदार्थ विज्ञान विषयात सर्वाधिक गुण प्राप्त करून प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या आणि अनुक्रमे भाग-२ व भाग-३ ला प्रवेशित घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु. ५००/- शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते.

शैक्षणिक सत्र २०२१-२२ व २०२२-२३ या सत्रातील कै.श्री शंकरराव गोविंद जोग व कै.श्रीमती पार्वतीबाई शंकरराव जोग शिष्यवृत्तीची अहवाल वर्षातील माहिती निरंक आहे.

ब) सन २०१९-२०२०, २०२०-२०२१, २०२१-२०२२ व २०२२-२३ या शैक्षणिक सत्रातील स्व. दिलीप बी. शिंगोरे शिष्यवृत्ती.

सदर शिष्यवृत्ती विनियम क्र. ३३/२००७ व ६/२०१५ प्रमाणे प्रदान करण्यात येते.
शैक्षणिक सत्र २०१९-२०, २०२०-२०२१. २०२१-२०२२ व २०२२-२३ या सत्रातील स्व. दिलीप बी. शिंगोरे शिष्यवृत्तीची अहवाल वर्षातील माहिती निरंक आहे.

क) सन २०२२-२०२३ व २०२३-२०२४ या शैक्षणिक सत्रातील स्व. मुकुंद नरहरी काळे स्मृती संशोधन शिष्यवृत्ती.
सदर शिष्यवृत्ती विनियम क्र. २/२०१० व सुधारणा विनियम क्र. ८/२०१७ प्रमाणे प्रदान करण्यात येते.

विनियम क्र. २/२०१० व सुधारणा विनियम क्र. ८/२०१७ प्रमाणे सन २०२२-२०२३ व २०२३-२०२४ या शैक्षणिक सत्रातील रु. १५,०००/- ची स्व. मुकुंद नरहरी काळे स्मृती संशोधन शिष्यवृत्ती.भौतिकशास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथे भौतिकशास्त्र या विषयामध्ये आचार्य पदवीकरिता संशोधन करणारी कु. नेहा प्रेमसिंग जाधव ह्यांना प्रदान करण्यात आलेली आहे.

ड) सन २०२२-२०२३ या शैक्षणिक सत्रातील वीर उत्तमराव मोहिते शिष्यवृत्ती
विनियम क्र. ३१/१९९८ प्रमाणे, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या कला स्नातक परीक्षेत इतिहास या विषयात सर्वाधिक गुण प्राप्त करून प्रथम प्रयत्नात व कमीतकमी वेळेत परीक्षा उत्तीर्ण केलेल्या व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयात वाङमय पारंगत भाग-१ ला इतिहास हा विषय घेऊन प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यास सदर शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते.

शैक्षणिक सत्र २०२२-२३ या सत्रातील वीर उत्तमराव मोहिते शिष्यवृत्तीची अहवाल वर्षातील माहिती निरंक आहे.

इ) सन २०२१-२०२२ व २०२२-२०२३ या शैक्षणिक सत्रातील श्री संत गुलाबराव महाराज संशोधन आर्थिक साहाय्य.
सदर शिष्यवृत्ती विनियम क्र. १३/१९९६ व सुधारणा विनियम क्र. ७/१९९९, २०/२००९ व २/२०११ प्रमाणे प्रदान करण्यात येते.

शैत्रणिक सत्र २०२१-२०२२ व २०२२-२०२३ साठी विद्यार्थ्यांची नोंदणी झालेली नसल्यामुळे, अहवाल वर्षातील माहिती निरंक आहे.

फ) सन २०२१-२०२२ व २०२२-२३ शैक्षणिक सत्रातील श्री त्र्यंबक गणपतराव कावलकर संशोधन शिष्यवृत्ती

सदर शिष्यवृत्ती विनियम क्र. ५/२००९ प्रमाणे प्रदान करण्यात येते.

विनियम क्र. ५/२००९ प्रमाणे आवेदित विद्यार्थ्यांमधून एम.एस्सी. (वनस्पतिशास्त्र) या परीक्षेत सर्वाधिक गुण प्राप्त केलेल्या व पद.वनस्पतिशास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथे विज्ञान विद्या शाखेमधून पीएच.डी साठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यास सदर संशोधन शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते.

शैत्रणिक सत्र २०२१-२०२२ व २०२२-२०२३ करिता पात्रताधारक विद्यार्थी प्रवेशित नसल्यामुळे, अहवाल वर्षातील माहिती निरंक आहे.

*****

प्रकरण आठवे
Information Regarding Research Papers, Conference, Patents & Awards

1) Statement showing the particulars of Research Papers Published in UGC CARE LIST / SCOPUS/ Web of Science by the Teachers of the Affiliated Colleges.

Sr. No.	Name of College		Subject	Number of teachers who had published the papers	Number of Papers Published
1.	2.		3.	4.	5
1.	Govt. Vidarbha Institute of Science & Humanaties Amravati.	1.	Statistics	1	3
		2.	Psychology	2	2
		3.	Philosophy	1	1
2.	Shri Shivaji Arts & Commerce College, Amravati		Political Science	1	1
3.	Smt. Kesharbai Lahoti College, Amravati	1.	Sociology	2	2
		2.	Geography	1	1
		3.	Commerce	4	6
		4.	English	3	3
		5.	Parsian	1	1
4.	Mahatma Fule Arts, Commerce & Sitaramji Chaudhari Science College, Warud	1.	Botany	1	1
		2.	Chemistry	1	1
		3.	Zoology	1	3
		4.	Home Eco.	1	1
		5.	Marathi	1	1
		6.	Philosophy	1	1
		7.	Lib. & Inf. Sci.	1	1
		8.	Commerce	1	1
5.	Adarsha Science J.B. Arts & Birla Comerce Mahavidyalaya Dhamangaon Rly.		Chemistry	2	2
6.	J.D. Patil Sangludkar Mahavidyalaya, Daryapur	1.	Physics	1	6
